सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १८ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

लहान मुलांसाठीही 'इंटरनेट' हा मूलभूत हक्क

सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय ; वापरावर पूर्ण बंदी घालण्यास ठाम नकार

नवी दिल्ली : लहान मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने (सुप्रीम कोर्ट) एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. घटनेच्या 'कलम २१' (जीवनाचा अधिकार) आणि 'कलम १९(१)(अ)' (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) अंतर्गत, इंटरनेट वापरण्याचा अधिकार हा लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाचा 'मूलभूत हक्क' असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. "मुलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वातंत्र्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून त्या दोन्ही एकत्र जपणे गरजेचे आहे," असे परखड मत न्यायालयाने मांडले आहे.

सोशल मीडियावर पूर्ण बंदी नको, 'चाइल्ड मोड'सारख्या पर्यायांचा वापर करा

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी केली. इंटरनेट आणि सोशल मीडियावरून मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित (CSEAM) आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी कडक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे रोखणे चुकीचे असून, त्याऐवजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'चाइल्ड मोड'सारखे सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देऊन त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे, असे सूचक मत खंडपीठाने व्यक्त केले.

नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता मुंबई : हिवाळी अधिवेशनाच्या (Winter Assembly) पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळातील फेरबदलांची चर्चा पुन्हा सुरू झाली असून, ...

आपल्या आदेशात सुप्रीम कोर्टाने नमूद केले की, "संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर फक्त मोठ्यांचाच हक्क नाही, तर कोणत्याही वयातील मुलांचाही त्यावर तितकाच अधिकार आहे. एखाद्या ठरावीक वयाखालील मुलांना समज नसते किंवा त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसते, असा विचार करून त्यांना या अधिकारांपासून पूर्णपणे दूर ठेवणे अयोग्य आहे. मुलांचे संरक्षण करणे जितके गरजेचे आहे, तितकेच त्यांचे स्वातंत्र्य जपणेही आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधात नसून, आपण मुलांना सुरक्षा आणि स्वातंत्र्य दोन्ही दिले पाहिजे."

'घोटाळ्यासाठी पीडितालाच जबाबदार धरण्यासारखे'

सध्याचे इंटरनेट मुलांच्या सुरक्षेसाठी धोकेदायक ठरू शकते, हे न्यायालयाने मान्य केले. मात्र, जर ऑनलाइन कंपन्या आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यात अपयशी ठरत असतील, तर त्याची शिक्षा मुलांना देऊन त्यांच्या इंटरनेट वापरावरच बंदी घालणे योग्य नाही. ही तर समस्येसाठी पीडितालाच दोषी ठरवण्यासारखी गोष्ट होईल, असे न्यायालयाने ठामपणे सांगितले. संविधानातील 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'मध्ये नवीन माहिती मिळवणे, शिकणे आणि आपले विचार मांडणे या सर्व गोष्टींचा समावेश होतो, याकडेही कोर्टाने लक्ष वेधले.

ग्रामीण भागातील व गरजू मुलांसाठी इंटरनेट हेच शिक्षणाचे मुख्य माध्यम

इंटरनेट हे केवळ माहितीचे साधन नसून ज्ञान, सर्जनशीलता आणि विचारांची देवाणघेवाण करण्याचे मोठे व्यासपीठ आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलांसाठी इंटरनेट हे शिक्षणाचे आणि नवीन गोष्टी शिकण्याचे एकमेव साधन ठरत आहे. याशिवाय, विशेष गरजू मुलांसाठी (Special Needs Children) इंटरनेट हे असे एक माध्यम आहे, जिथे ते त्यांच्यासारख्या इतर मुलांशी जोडले जाऊ शकतात आणि आपले अनुभव शेअर करू शकतात. त्यामुळे इंटरनेट बंद करणे हा उपाय असू शकत नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

शिक्षकांना निवडणूक प्रचाराला जुंपणाऱ्या संस्थाचालकांची 'एसआयटी' चौकशी करणार

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

मुंबई : शिक्षकांना निवडणूक प्रचारासाठी काम करण्यास भाग पाडणाऱ्या आणि उमेदवाराला मतदान न केल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी देणाऱ्या शिक्षण संस्थाचालकांची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्यात येईल, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. अशा प्रकारे शिक्षकांवर दबाव आणणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्याचीही भूमिका त्यांनी मांडली. मुलांच्या शिक्षणाशी खेळ करून शिक्षकांना राजकीय प्रचारात उतरवणे सहन केले जाणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. बावनकुळे म्हणाले, राज्यात २८८ पैकी २३२ आमदार महायुतीचे असल्याने सरकार भक्कम आहे. निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. विदर्भात महायुतीची स्थिती मजबूत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महायुतीच्या विरोधात कोणी काम करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. अमरावती शिक्षक मतदारसंघातून महायुतीने शिवसेनेच्या किरण सरनाईक यांना उमेदवारी दिली आहे. सरनाईक निवडून आल्यास शिक्षकांचे मूळ प्रश्न सोडवण्यासाठी ते महायुतीच्या नेत्यांकडे पाठपुरावा करतील. शिक्षकांच्या प्रश्नांवर काम करणारा नेता म्हणून ते परिचित आहेत. त्यासोबतच राज्यातील पाचही जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

निवडणुकीच्या राजकारणासाठी काही शिक्षण संस्थांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी कानावर आल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, मतदान करणे हा प्रत्येकाचा अधिकार आणि जबाबदारी आहे. मात्र, एखाद्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी शिक्षकांवर दबाव आणणे किंवा मतदान न केल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी देणे गंभीर बाब आहे. अशा तक्रारी आल्यास संबंधित संस्थेची एसआयटीमार्फत चौकशी केली जाईल आणि गरज पडल्यास मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

मांजरा धरणाची पाणीपातळी तळाला; अवैध उपसा रोखण्यासाठी पथके तैनात



अंबाजोगाई : बीड, धाराशिव व लातूरची तहान भागवणाऱ्या मांजरा धरणात 15 ऑक्टोबरपर्यंत केवळ 8.72 टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. वाढत्या ऑक्टोबर हिट मुळे धरणातून दररोज 0.085 दलघमी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याने जलसंकट अधिकच गंभिर बनले आहे. पावसाअभावी उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले असून, सिंचनावरील उपसा पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. अवैध उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने आता चार भरारी पथके तैनात केली आहेत. बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांचे साहित्य जप्त करून त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल केले जातील, असा कडक इशारा धरण अभियंता नामदेव घोडके यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांना केंद्राकडून मदतीसाठी प्रयत्न करणार : केंद्रीय राज्यमंत्री आठवले

परभणी/प्रतिनिधी

एल - निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री म्हणून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळावी, यासाठी शिफारस करणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. ते सेलू तालुक्यातील वालूर येथे शेतकरी तजम्मूल अहमद अब्दुल हक अन्सारी यांच्या शेतातील हळद पिकाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते.

यावेळी नगराध्यक्ष मिलिंद सावंत, तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, कृषी अधिकारी शेळके आणि मंडळ अधिकारी प्रभावती खाकरे उपस्थित होते. गतवर्षीच्या पीक विम्याची रक्कम अद्याप मिळाली नसल्याचे सांगतानाच, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मराठवाड्यात केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक आले होते; मात्र आपल्या भागाची पाहणी झाली नसल्याची खंतही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. पिकांचे नुकसान, सिंचनासाठी पाण्याची अनुपलब्धता आणि प्रलंबित पीक विमा यामुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी अधिक गंभीर झाल्याचे या पाहणीदरम्यान समोर आले असल्याचे केंद्रीय राज्यमंत्रीआठवले यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये थेट आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी शेतकरी अन्सारी यांनी यावेळी केली.

सायबर क्राईम बाबत जनजागरण

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- पैठण पोलिसांच्या वतीने उप विभागीय पोलीस अधिकारी पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या प्रमुख उपस्थित नागरिकांना सायबर फ्रॉड बाबत जनजागरण करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नागरिकांना कोणत्याही आमिषा बद्दल सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले. सायबर जनजागृती माह निमित्त पोलीस स्टेशन पैठण येथील सायबर गुन्ह्याचे विविध प्रकार व त्यावरील उपाय योजना दाखवणारे बॅनर पोलीस स्टेशन येथील शासकीय वाहनावर लावण्यात आले असून वाहनावर स्पीकर बसून पंधरा मिनिटाची ऑडिओ क्लिप सायबर गुन्ह्याविषयी लावण्यात आली. सदर वाहन पोलीस स्टेशन हद्दीमधील महत्त्वाच्या ठिकाणी उभा करून लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी याचा उपयोग करण्यात आला.

पोलीस-जनता समन्वयाचा आदर्श; बिलोलीत लोकसहभागातून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित

छोटा हनुमान मंदिर परिसरावर आता सीसीटीव्हीची नजर

नांदेड(प्रतिनिधी) शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासोबतच गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय किती प्रभावी ठरू शकतो, याचा आदर्श बिलोली पोलिसांनी घालून दिला आहे. शहरातील मध्यवर्ती छोटा हनुमान मंदिर परिसरात लोकसहभागातून आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, ही सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. पोलीस आणि जनता यांच्या संयुक्त प्रयत्नांतून साकारलेला हा उपक्रम शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक शाम पानेगावकर आणि बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या पुढाकारातून ही मोहीम राबविण्यात आली. चोरी, घरफोडी, टवाळखोरांचा उपद्रव तसेच अन्य अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावी ठरणार आहे.

सीसीटीव्ही ठरणार पोलिसांचा 'तिसरा डोळा'

सध्याच्या काळात गुन्ह्यांचा तपास करताना सीसीटीव्ही फुटेज महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. गुन्हा घडल्यानंतर संशयितांचा माग काढणे, त्यांच्या हालचालींचा मागोवा घेणे आणि गुन्ह्याचा छडा लावणे यासाठी या यंत्रणेची मोठी मदत होते. त्यामुळे छोटा हनुमान मंदिर परिसरात बसविण्यात आलेले कॅमेरे पोलिसांसाठी 'तिसरा डोळा' ठरणार आहेत. परिणामी, या परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, भाविक आणि व्यापाऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

लोकसहभागातून सुरक्षित शहराचा संकल्प

केवळ पोलीस यंत्रणेच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता नागरिकांनीही आपल्या परिसराच्या सुरक्षेसाठी पुढाकार घेतल्यास गुन्हेगारी नियंत्रण अधिक प्रभावी होऊ शकते, हे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे. शहरातील व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक मंडळे आणि जागरूक नागरिकांनी अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदविण्याची गरज आहे.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत आगामी काळात मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी व्यापारी वर्ग, सामाजिक व धार्मिक मंडळे, ग्रामपंचायती आणि सुज्ञ नागरिकांनी पुढे येऊन पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

पोलीस आणि जनता यांच्यातील विश्वास, समन्वय आणि सहकार्य यांतूनच सुरक्षित समाजाची निर्मिती होऊ शकते. बिलोलीतील हा उपक्रम त्याचाच एक आदर्श नमुना ठरत आहे.

किनवट परिसरात रेल्वेच्या धडकेने 3 ते 4 वर्षांच्या मादी वाघाचा दुर्दैवी मृत्यू; सावरी वन आगारात अग्निसंस्कार

किनवट (प्रतिनिधी) : बोधडी वनपरिक्षेत्रातील दरसांगवी नियतक्षेत्रात रेल्वेच्या धडकेत एका मादी वाघाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. किनवट ते नांदेड रेल्वे मार्गावर सोमेश्वर महादेव मंदिराच्या (मदनापूर) परिसरात ही घटना उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रेल्वे लाईनवर एका मादी वाघाचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी व प्रतिनिधी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये नांदेडच्या उप वनसंरक्षक मनिषा पाटील, सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) एस. डी. इटलोड, सहायक वनसंरक्षक (जकास व कॅम्पा) किरण चव्हाण, बोधडीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सी. जी. पोतुलवार, किनवटचे वनपरिक्षेत्र अधिकारी धिरज मदने, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे (NTCA) प्रतिनिधी अतिद्र कटी आणि पार्डी येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल मोतीराम जोंधळे यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला.

प्रारंभिक तपासात सदर मादी वाघिणीचा मृत्यू रेल्वेच्या धडकेनेच झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मृत वाघिणीचे वय अंदाजे ३ ते ४ वर्षे असून तिच्या शरीराचे सर्व अवयव सुरक्षित आणि अबाधित असल्याचे पंचनाम्यादरम्यान आढळून आले.

सावरी वन आगारात शवविच्छेदन व दहन : घटनेचा रीतसर पंचनामा झाल्यानंतर मृत मादी वाघाचे शव सावरी वन आगार येथे आणण्यात आले. तेथे उप वनसंरक्षक मनिषा पाटील, सहायक वनसंरक्षक एस. डी. इटलोड आणि NTCA प्रतिनिधी अतिद्र कटी यांच्या उपस्थितीत तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने शवविच्छेदन (Post-Mortem) केले. या पथकात किनवटचे पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. संजीव विठ्ठलराव पाटील, डॉ. राहुल मोतीराम जोंधळे (पार्डी), डॉ. योगेश शामराव पाटील (माळबोरगाव), डॉ. निरंजन दत्तात्रय बागल (जलधरा) आणि डॉ. सुनील आनंदराव जाधव (मांडवी) यांचा समावेश होता. शवविच्छेदनानंतर पुढील उत्तरीय तपासणीसाठी विसेराचे नमुने घेण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व अधिकारी व पंचांच्या समक्ष सावरी आगारात मृत वाघिणीवर शासकीय नियमानुसार दहनसंस्कार करण्यात आले.

या कारवाईप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी टी. एन. साळुके (वन्यजीव, खरबी), रेल्वे पोलीस किनवटचे सहायक उपनिरीक्षक भगवान नागरे यांच्यासह वनविभागाचे इतर कर्मचारी व वनपाल उपस्थित होते. रेल्वे मार्गावर वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

रब्बी हंगामासाठी उजव्या कालव्याचे पाणी द्या : सभापती जयदत्त नरवडे यांचे जलसंपदा मंत्र्यांना साकडे

माजलगाव, प्रतिनिधी : माजलगाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता रब्बी हंगामातील पिकांना संजीवनी देण्यासाठी जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी सभापती जयदत्त नरवडे यांनी जलसंपदामंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. खरीप हंगामातील संकटानंतर आता रब्बी हंगामातील पिके घेण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे आहे. पाण्याअभावी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होऊ शकतो. त्यामुळे जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडल्यास ज्वारी, गहू, हरभरा यांसह अन्य रब्बी पिकांना मोठा आधार मिळणार आहे.

शेतीसाठी पाणी उपलब्ध झाल्यास पिके वाचविण्यास मदत होईल. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास हातभार लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने तातडीने निर्णय घ्यावा आणि उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यास मंजुरी द्यावी, अशी आग्रही मागणी सभापती श्री. नरवडे यांनी केली आहे. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, डॉ. वसीम मनसबदार, संभाजी शेजुळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीड मध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने ग्रंथालय प्रदर्शन संपन्न

बीड (प्रतिनिधी) : डॉ. ए.पी .जे अब्दुल कलाम 15 आक्टो .यांची जंयती वाचन प्रेरणा दिन निमित्त डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीड मध्ये ग्रंथप्रदर्शन उद्घाटन डॉ. मुकुंद पैठणकर यांच्या हस्ते संपन्न झाले . कार्यक्रमाचे अध्यक्ष रविंद्र देशमुख हे होते .

मार्गदर्शन करताना डॉ. मुकुंद पैठणकर यांनी प्रतिपादन केलेल डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र प्रेरणादायी साहित्य क्षेत्रात अग्निपंख हा ग्रंथ महत्वपूर्ण आदर्श प्रेरणादायी आहे .

यावेळी वाचनालयाचे पदाधिकारी नंदकिशोर झरीकर ॲड शिवाजी झरीकर अतुल कुलकर्णी प्रा शशिकांत पसारकर विनायक जोशी दिपक पाठक.तसेच "राजस्थानी विद्यालय सहयोग नगर बीड" च्या सह शिक्षिका सौ वंदना राडीकर. योगेश सिकची. अजितकुमार एकशिंगे. तसेच राजस्थानी विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन श्री रमाकांत शेरकर यांनी केले .या कार्यक्रमासाठी सुरेश जाडे यांनी परिश्रम घेतले. दिवसभरात विद्यार्थी ,वाचक सभासद यांनी ग्रंथप्रदर्शनास भेट देवून ग्रंथाची माहिती घेतली. व विविध ग्रंथ वाचन केले.

मृत पोलीस अंमलदाराच्या वारसांना एसबीआयकडून एक कोटींची मदत

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या हस्ते पत्नी सुनंदा सावंत यांना धनादेश सुपूर्द

बीड : परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार सौदागर माणिकराव सावंत यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना भारतीय स्टेट बँकेच्या सॅलरी पॅकेज खात्यांतर्गत एक कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या हस्ते त्यांच्या पत्नी सुनंदा सौदागर सावंत यांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. सौदागर सावंत यांचा १६ जानेवारी २०२६ रोजी बीड शहरातील स्वराज्यनगर परिसरात सरस्वती शाळेजवळ गतिरोधकावर स्कूटी आदळल्याने झालेल्या अपघातात मृत्यू झाला होता. त्यांच्या सॅलरी पॅकेज खात्याशी संबंधित विमा सुविधेतून त्यांच्या कुटुंबीयांना ही आर्थिक मदत देण्यात आली. या प्रक्रियेसाठी भारतीय स्टेट बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक अमित धुळे, मुख्य प्रबंधक योगेश रेंडाळकर, सहयोगनगर शाखेचे शाखा प्रबंधक श्रीकांत अंजनकर आणि सॅलरी पॅकेज विभागाचे अधिकारी प्रवीण तिडके यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस कल्याण विभागाचे एपीआय सचिन कापरे, मुख्यालयाचे पोलीस निरीक्षक पांडुरंग दळई आणि कर्मचारी जयश्री शिंदे यांनीही आवश्यक कार्यवाहीसाठी परिश्रम घेतले.

अंबाजोगाई घाटनांदूर रस्त्यावर भीषण अपघात; तरुणाचा जागीच मृत्यू

अंबाजोगाई : घाटनांदूर रस्त्यावरील पुस येथील शिवाजी चौकाजवळ भरधाव ॲपे रिक्षाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने २५ वर्षीय तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हा अपघाता दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडला होता, याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील रस्त्यावरून संदीप कोंडबा नवघरे (वय २५, रा. उटी, ता. महागाव, जि. यवतमाळ) हा तरुण आपल्या दुचाकीवरून जात असताना शिवाजी चौकापासून १०० फूट अंतरावर समोरून येणाऱ्या ॲपे रिक्षा (क्र. MH 28 E 8750) च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून दुचाकीला धडक दिली. या धडकेत संदीप नवघरे याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा

जागीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेला प्रदीप नावाचा तरुण किरकोळ जखमी झाला आहे. या प्रकरणी मृताचे वडील कोंडबा चंपत नवघरे (वय ७९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बर्दापूर पोलीस ठाण्यात अपे रिक्षा चालकाविरुद्ध गु.र.नं. २७८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार सूर्यवंशी हे करत आहेत.

गेवराई बस स्थानकावर वृद्ध महिलेचे मंगळसूत्र लांबवणारी चोरटी जेरबंद; 64 हजारांचा मुद्देमाल जप्त

गेवराईत पोलिसांची तातडीने कारवाई; गुप्त माहितीच्या आधारे महिला आरोपीला बेड्या

गेवराई : बस स्थानक परिसरात एसटी बसमध्ये चढताना गर्दीचा गैरफायदा घेऊन एका वृद्ध महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र चोरणाऱ्या महिला आरोपीला गेवराई पोलिसांनी तातडीने शोध घेऊन अटक केली आहे. तिच्याकडून चोरीला गेलेले सोन्याचे मणी मंगळसूत्र हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

बोरी पिंपळगाव येथील रहिवासी असलेल्या ६५ वर्षीय सुमन मल्हारी पाचपुते या गेवराई बस स्थानकावरून गुळज येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी बसमधील प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र हातचलाखीने चोरून नेले. या दागिन्याची किंमत सुमारे ६४ हजार रुपये इतकी आहे. दागिना चोरीला गेल्याचे लक्षात येताच महिलेने गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला.

घटनेचे गांभीर्य ओळखून गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने परिसराची पाहणी केली आणि गुप्त बातमीदारांमार्फत माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान मिळालेल्या सुगाव्याच्या आधारे पोलिसांनी बीड येथील माऊली नगर, नाळवंडी नाका परिसरातील रहिवासी असलेल्या जयश्री संतोष जाधव या ३० वर्षीय महिला आरोपीला ताब्यात घेतले.

पोलिसांनी महिला आरोपीची कसून चौकशी केली असता तिने चोरीची कबुली दिली. पोलीस कोठडीदरम्यान आरोपी महिलेकडून चोरीस गेलेले आठ ग्रॅम वजनाचे ६४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मणी मंगळसूत्र पूर्णपणे जप्त करण्यात आले आहे.

सदर यशस्वी कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान दौड, पोलीस अंमलदार गव्हाणे, खताळ, ओव्हाळ, पोटे, बागवान आणि महिला पोलीस अंमलदार वडमारे यांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार हरिश्चंद्र खताळ करत आहेत.

बीडमध्ये फलोत्पादन पीक कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प अंतर्गत प्रशिक्षण संपन्न; दुष्काळी परिस्थितीत फळबाग जगवण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

बीड, १५ ऑक्टोबर: फलोत्पादन पिकावरील कीड, रोग सर्वेक्षण, सल्ला व प्रकल्प व्हॉट्सॲप (सन २०२६-२७) अंतर्गत बीड उपविभागातील सर्वेक्षण करणारे अधिकारी, कर्मचारी तसेच निश्चित प्लॉट धारक शेतकऱ्यांचे एकदिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण नुकतेच संपन्न झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुष्काळी परिस्थितीत फळबागांचे व्यवस्थापन आणि कीड नियंत्रण करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय कृषी अधिकारी श्री. उद्धवजी गरजे यांनी केले. त्यांनी या प्रकल्पाची पार्श्वभूमी सांगून सन २०२६-२७ या वर्षातील उद्दिष्टे स्पष्ट केली.

दुष्काळ सदृश परिस्थितीत फळबाग व्यवस्थापनाचे धडे

या प्रशिक्षण शिबिरात कृषी विज्ञान केंद्र, खामगाव (ता. गेवराई) येथील उद्यान विद्याशास्त्रज्ञ डॉ. श्री. गणेश मंडलिक यांनी उपस्थित अधिकारी आणि शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. "सध्याच्या दुष्काळ सदृश परिस्थितीमध्ये उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करून फळबागा कशा जगवाव्यात, याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे," असे डॉ. मंडलिक यांनी सांगितले. यासोबतच प्रकल्पांतर्गत पिकांची अचूक निरीक्षणे कशी घ्यावीत, याबाबतही त्यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले.

कीटकशास्त्रज्ञ डॉ. श्री. भैय्यासाहेब गायकवाड यांनी फळपिकांवर पडणाऱ्या विविध किडींची माहिती देऊन त्यांच्या व्यवस्थापनावर प्रकाश टाकला. त्यांनी डिजिटल सादरीकरणाद्वारे (सचित्र) फळपिकांचे कीड नियंत्रण अत्यंत प्रभावीपणे कसे करावे, याचे सोपे उपाय शेतकऱ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्री. प्रशांत नालपे यांनी केले. या प्रशिक्षणाचा फायदा बीड उपविभागातील कृषी अधिकारी, कर्मचारी आणि निवडक प्लॉट धारक शेतकऱ्यांना होणार असून, मिळालेल्या माहितीच्या आधारे आता क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या कामाला गती दिली जाणार आहे.

कुणबी-मराठा विद्यार्थ्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र द्यावेत - अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी

दिरंगाईस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कार्यवाही करा - जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण

राणा चव्हाण
(जिल्हाध्यक्ष,अखिल भारतीय मराठा महासंघ,बीड)

अंबाजोगाई : कुणबी-मराठा विद्यार्थ्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र द्यावेत अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना गुरूवारी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. बीड जिल्हा जात पडताळणी समितीमार्फत याप्रकरणी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे अशी तमाम मराठा समाजाची जनभावना झाली आहे. त्यामुळे कुणबी-मराठा विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यास दिरंगाई करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे.

याविषयी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढारे यांच्या नेतृत्वात, आणि विभागीय अध्यक्ष गोपाळराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनात बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी गुरूवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी, बीड व जिल्हा जात पडताळणी समिती यांना दिलेल्या नविदनात म्हटले आहे की, शासन निर्णय दिनांक ०२/०९/२०२३, दिनांक २६/०१/२०२४ व हैद्राबाद गॅझेट नुसार ज्या मराठा बांधवांच्या पूर्वजांच्या नोंदी कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी अशा आहेत, त्यांना कुणबी जात प्रमाणपत्र व त्याची वैधता देण्याचे स्पष्ट आदेश आहेत. माननीय उच्च न्यायालयाने देखील अशा प्रस्तावांवर ६ महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. बीड जिल्ह्यात मागील ३ महिन्यांपासून अनेक कुणबी-मराठा विद्यार्थ्यांनी वैधतेसाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी अनेकांची महसूल चौकशी, तलाठी / तहसीलदार अहवाल व समिती समोर सुनावणी (हिअरींग) होऊन ही १ ते २ महिने झाले तरी वैधता प्रमाणपत्र दिले जात नाही. एका अर्जदार विद्यार्थ्यांस सुनावणी, तहसील कार्यालयीन पत्र अहवाल, परत इतर कागदपत्रे असे वारंवार बोलून विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या त्रास देवून त्यांना हैराण करणे (हर्सर्मेंट) सुरू आहे. सदरील ऑफिस जिल्ह्याच्या ठिकाणी बीडला असल्याकारणाने अंबाजोगाई, परळी या तालुक्यातील विद्यार्थ्यांना तर जाणे येणे अंतर २०० किलोमीटर पेक्षा जास्त पडते. वेळ वाया जातो. अधिकारी वर्ग हा जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे विधी (एल.एल.बी), वैद्यकीय (एम.बी.बी.एस), अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग), बीएड अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सीईटी सेलची ६ महिन्यांची मुदत संपल्या नंतर प्रवेश रद्द होण्याची भीती निर्माण झाली आहे. ही बाब शासनाच्या धोरणाच्या विरोधात असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर गदा आणणारी आहे. बीड जिल्ह्यात सुनावणी पूर्ण झालेल्या, तहसील कार्यालयीन पत्र मिळालेल्या व इतर कागदपत्रांची पूर्त केलेल्या सर्व कुणबी-मराठा वैधता प्रस्ताव लवकरात लवकर तात्काळ निकाली लावून प्रमाणपत्रे वितरित करण्यात यावीत.

अंबाजोगाई ग्रामीण रुग्णालयात गैरहजेरीचा दणका : दोन वैद्यकीय अधिकारी निलंबित...!

अंबाजोगाई : रुग्ण उपचारासाठी ताटकळत असताना वैद्यकीय अधिकारीच गैरहजर राहत असल्याचा प्रकार अंबाजोगाईच्या ग्रामीण रुग्णालयात समोर आला आहे. सतत गैरहजर राहिल्याचा ठपका ठेवत दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याने आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे.

अंबाजोगाई शहरातील मंडीबाजार परिसरात सार्वजनिक आरोग्य विभागाचे ग्रामीण रुग्णालय आहे. हे रुग्णालय सध्या विविध मुद्यांनी गाजत आहे. या रुग्णालयात ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, अपुऱ्या सुविधा आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सतत गैरहजेरीमुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याच्या तक्रारी सातत्याने रुग्ण व त्यांचे नातेवाईक करीत होते.

या तक्रारींची दखल घेत बीड येथील वैद्यकीय अधिकारी शेख रौफ यांनी रुग्णालयाला भेट देऊन रुग्णालयाचा चांगलाच पंचनामा केला. यावेळी काही वैद्यकीय अधिकारी नियमित गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सतत गैरहजर राहणाऱ्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

रविवारी बीड जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा आणि निवड चाचणी..

गेवराई, दिनांक 16 (प्रतिनिधी)-एमॅच्युअंर खो-खो असोसिएशन बीड आयोजित बीड जिल्हा अजिंक्यपद किशोर-किशोरी व पुरुष महिला खो-खो स्पर्धा आणि निवड चाचणी ही दि.18 ऑक्टोबर 2026 वार रविवार या रोजी राजर्षी शाहू कन्या विद्यालय ,तेलगाव नाका ,बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. किशोर- किशोरी खेळाडूंसाठी 14 वर्षे आतील मुलांचा समावेश असेल व पुरुष महिला या खेळाडूंसाठी वयाची अट नाही. या निवड चाचणीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी सकाळी ठीक 10 वाजता उपस्थित राहून स्पर्धेत सहभाग घ्यावा. या स्पर्धेत निवड झालेल्या किशोर- किशोरी खेळाडू मानवत जि. परभणी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा नेतृत्व करतील. तसेच पुरुष महिला हे खेळाडू आले नगरीत होणाऱ्या राज्य स्पर्धेत बीड जिल्ह्याचा नेतृत्व करतील. बीड जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी खालील तज्ञ निवड समिती नियुक्त करण्यात आली आहे.

किशोर -किशोरी निवड समिती. 1) अंकुश गायकवाड (पाटोदा) 2) सचिन मंजुळे (माजलगाव) 3) नवनाथ चव्हाण (गेवराई) 4) अर्जुन खोड (बीड) पुरुष महिलांसाठी 1) मुंजाराम निरडे (धारूर). 2) नितीन पुटवाड (माजलगाव). 3) श्रीमती सुनिता जायभाय (बीड) 4) भरत यादव (गेवराई) यांच्यावर बीड जिल्ह्याचे संघ निवडण्याची जबाबदारी आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व खो खो खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी व्हावे ,असे आवाहन छत्रपती पुरस्कार विजेते प्रा.जे पी शेळके , राज्य खो खो संघटनेचे प्रसिद्धी समिती सदस्य प्रा.राजेंद्र बरकसे , बापूसाहेब तारूकर , विष्णू आदनाक, संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे, विष्णू गवते,सचिव विजय जाहेर, मनोज जोगदंड श्रीमती वर्षा कच्छवा, योगेश सोळसे यांनी केले आहे.

धारूर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे तात्काळ भरा!

आ.प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

धारूर / प्रतिनिधी

धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने रुग्णांना वेळेवर व योग्य वैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. ही बाब गांभीर्याने घेत ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची तात्काळ नियुक्ती करून नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल सेलचे शहराध्यक्ष रोहित मुकुंदराव फावडे यांनी आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

धारूर ग्रामीण रुग्णालय हे धारूर शहरासह तालुक्यातील अनेक ग्रामीण भागांतील नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, डॉक्टरांची अपुरी संख्या आणि उपलब्ध वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर वाढणारा कामाचा ताण यामुळे रुग्णांच्या तपासणी व उपचारांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. गरीब व गरजू रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने ग्रामीण रुग्णालयावरच अवलंबून राहावे लागते.

ग्रामीण रुग्णालयात दररोज विविध आजारांनी ग्रस्त रुग्ण, महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच आपत्कालीन परिस्थितीतील रुग्ण उपचारासाठी येतात. अशा वेळी पुरेसे डॉक्टर उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः गंभीर रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत मिळणे गरजेचे असताना डॉक्टरांची कमतरता ही चिंतेची बाब ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरून रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत अशी मागणी आमदार प्रकाश दादा यांच्याकडे फावडे यांनी केली, तसेच गंभीर रुग्णांना आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी, यासाठी संबंधित प्रशासनाला सूचना देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली.

दुष्काळाचे भान जपत सजग नागरिकाचे कर्तव्य निभावल्याबद्दल रत्नपारखी यांच्या कार्यावर मुंडे भगिनीची कौतुकाची थाप

माजलगाव (प्रतिनिधी) - सध्या संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात असताना, कोणताही गाजावाजा न करता सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवून साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याबद्दल भारतीय जनता पार्टीचे माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांचे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रीतम ताई मुंडे यांनी विशेष कौतुक करून पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी विनायक रत्नपारखी यांना दूरध्वनीवरून शुभेच्छा देताना सांगितले की, "दुष्काळग्रस्त परिस्थिती लक्षात घेऊन आपण एक सजग आणि कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून जो आदर्श घालून दिला आहे, व कुठलाही गाजावाजा न करता आपण सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवत अतिशय साध्या पद्धतीने वाढदिवस केला हे खरोखरच कौतुकास्पद आहे."

विनायक रत्नपारखी यांनी आपला वाढदिवस सकाळी माजलगाव येथील देवखेडा गोशाळेत गोमातेला चारा वाटप करून चाऱ्यासाठी देणगी दिली. दुपारी महात्मा ज्योतिबा फुले शाळेत गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.

सध्या शारदीय नवरात्र उत्सव सुरू असल्याने सायंकाळी जिजामाता नगर येथील तुळजाभवानी मातेच्या मंदिरात त्यांनी महापूजा व महाआरती केली. यावेळी "परतीचा पाऊस लवकर येऊ दे आणि संकटात सापडलेल्या बळीराजाला या संकटावर मात करण्याची शक्ती दे," अशी भावपूर्ण प्रार्थना तुळजाभवानी मातेच्या चरणी केली व उपस्थित सर्व भक्तांना फराळाचे वाटप केले.

केवळ बॅनरबाजी आणि सत्कार समारंभापेक्षा दुष्काळाचे भान ठेवून समाजासाठी काहीतरी करण्याची रत्नपारखी यांची ही भूमिका सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरत असून, मुंडे भगिनींनी केलेल्या कौतुकामुळे त्यांना पुढील सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा मिळाली आहे. या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे व परशुराम हिंदू सेवा संघाचे विविध पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होते. विनायक रत्नपारखी यांनी वाढदिवसानिमित्त कुठलाही सत्कार घेणार नाही असे आव्हान केल्यामुळे भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, भाजपाचे राज्य परिषद सदस्य अरुण राऊत , मा नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके डॉ प्रशांत पाटील, अभय होके पाटील प्रशांत भानप ,प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर डॉ स्वानंद कुलकर्णी सुधाकर देशमुख बाळासाहेब देशपांडे भाजपाचे चिटणीस उपाध्यक्ष अविनाश कांडूरे अर्जुन नाईकनवरे जयंता अकोलकर सुनील मोगरेकर बाळासाहेब क्षीरसागर कोषाध्यक्ष अनंत कुलकर्णी दत्ता महाजन, राजाभाऊ लोखंडे , विनोद लड्डा बीड जिल्हा युवा मोर्चाचे शहाजी सोळंके ,मनोज कोरडे , पूजाताई मुंडकर भारतीताई घुबडे गोपाळ कुलकर्णी , दुर्गादास देशमुख शिवसेनेचे म्हणजे पापा सोळंके , नगरसेवक डॉ सचिन देशमुख सत्य प्रेम देशमुख कैलास जोशी निरंजन वाघमारे डॉक्टर आनंद लोढा मुकुंद जोशी सतीश जोशी राजे शिवाजी गणेश मंडळाचे विकास पाटील मदन पांढरे संदीप राऊत बाळू शिंदे व पदाधिकारी ,हिमांशु देशमुख , पवन मोगरेकर , प्रल्हाद दळवे , उगले ,भरत जोशी मुख्याध्याप मसलेकर ,खालील पटेल नानासाहेब घोडके, अभिजीत गिलानकर , मनोज फरके यांनी विनायक रत्नपारखी यांना वृक्ष देऊन तर कोणी पुस्तक देऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त दूरध्वनीवर देखील अनेकांनी शुभेच्छा दिल्या यामध्ये भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख उद्योगासाठी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस तथा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विश्वचित देशपांडे , नितीन नाईकनवरे माधव निर्मळ आप्पासाहेब जाधव डॉ अभिजीत सोळंके दक्षिण आफ्रिकेतून विनय गदगकर , केजचे पत्रकार धनंजय कुलकर्णी चारूदत्त करमाळकर रूपाली कचरे शरद कचरे , नवनाथ गायकवाड विजय शिंदे अर्जुन पायघन सुशांत जाधवर उमेश मोगरेकर तुकाराम येवले कमलेश जाबरस , सामनाचे दै प्रजापत्राचे संपादक संजय मालानी दैनिक तरुण भारतचे जगन्नाथ देशमुख एडवोकेट दीपक देशमुख सुधीर नागापुरे सह भाजपा पदाधिकारी व्यापारी व सहकार शैक्षणिक विविध क्षेत्रातील व्यक्तींनी दूरध्वनी वरून शुभेच्छांचा वर्षाव केला यांनी दूरध्वनीवरून फोन करून शुभेच्छा दिल्या.

छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

जागतिक के-पॉप आणि भारतीय कलाकारांच्या यादीची घोषणा

मुंबई : बहुप्रतिक्षित वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया च्या पहिल्या पर्वासाठी कलाकारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून के-पॉप आणि भारतीय संगीतविश्वातील काही आघाडीचे कलाकार एकाच मंचावर येणार आहेत. हा महोत्सव 27 आणि 28 मार्च 2027 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन होणार आहे. या दोन दिवसीय महोत्सवात के-पॉप आणि जागतिक संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकारांची प्रभावी मांदियाळी पाहायला मिळणार आहे. यामध्ये बमझ्यु, डयॉन, एनहायपेन, एरिक नाम, ह्वासा, जागतिक स्तरावर लोकप्रिय असलेल्या केटीएसआयआई या गर्ल ग्रुपची सदस्या लारा राज, ली ह्वान, ले सेराफिम, रिया राज आणि टुमॉरो एक्स टुगेदर यांचा समावेश आहे.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ने आर्थिक कामगिरी जाहीर केली

बंगळूरु : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ने आज सप्टेंबर 2026 मध्ये संपलेल्या तिमाहीची आर्थिक कामगिरी जाहीर केली. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या पूर्णवेळ संचालक आणि अंतरिम मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री कॅरोल फुर्टाडो म्हणाल्या, "वाढीचा वेग कायम ठेवण्यासाठी संचालक मंडळाने 409 कोटी रु. ची भांडवल उभारणी करण्यास प्राधान्य वाटपाद्वारे मंजुरी दिली आहे. या माध्यमातून इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन, बजाज लाइफ इन्शुरन्स लिमिटेड, एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स आणि आदित्य बिर्ला सन लाइफ इन्शुरन्स यांच्याकडून निधी उभारला जाणार आहे. ही प्रक्रिया भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन आहे. ही भांडवल उभारणी सध्याच्या बीव्हीपीएस अधिक प्रीमियमवर केली जात असल्याने, सप्टेंबर 2026 अखेर प्रति समभाग अंदाजे 0.8 रु. ची वाढ होईल. याव्यतिरिक्त, ऑक्टोबर महिन्यात बँकेने सिक्युरिटायझेशन माध्यमातून 500 कोटी रु. ची भर घालून आपल्या निधी उभारणीच्या स्रोतांमध्ये विविधता वाढवली आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून 'टोयोटा-ई-कक्षा' मोबाइल संगणक बस सुरु

मुंबई : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी सुरत जिल्हा पंचायतीच्या सहकार्याने आज 'टोयोटा-ई-कक्षा' या मोबाइल संगणक बस उपक्रमाचा प्रारंभ केला. जिल्ह्यातील सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे आणि त्यांना मूलभूत माहिती तंत्रज्ञानाचे (आयटी) शिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. गुजरातचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. हर्ष संघवी यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुरत जिल्हा पंचायतीचे जिल्हा विकास अधिकारी श्री. देवेंद्र प्रकाश मीना (आयएएस) तसेच टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.११ मार्च २०२६ रोजी टीकेएम आणि सुरत जिल्हा पंचायतीदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत टीकेएमकडून २१ संगणक, इंटरनेट सुविधा, शैक्षणिक सॉफ्टवेअर आणि परस्परसंवादी डिजिटल शिक्षण साधनांनी सुसज्ज असलेली मोबाइल संगणक शिक्षण बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही बस जिल्ह्यातील विविध सरकारी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संगणक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देईल.

उद्योगांना ऐतिहासिक पतविषयक माहिती रेकॉर्डेंटतर्फे उपलब्ध

नाशिक: भारतातील एकमेव युनिफाइड क्रेडिट रिस्क अँड रिसीव्हेबल्स प्लॅटफॉर्म असलेल्या 'रेकॉर्डेंट' ने नाशिक येथे आयोजित एका सेमिनारमध्ये, शाश्वत व्यावसायिक वाढ साध्य करण्यासाठी आणि क्रेडिट जोखीम कमी करण्यासाठी डेटा-आधारित क्रेडिट मूल्यांकनाचे महत्त्व अधोरेखित केले.या परिसंवादात रेकॉर्डेंटचे मुख्य उत्पादन अधिकारी, मनीष घोषाल यांनी "कमी पत जोखमीसह व्यवसायाच्या वाढीला चालना देणे" या विषयावर एक सत्र आयोजित केले होते. विश्वसनीय पत माहिती, परतफेडीचा इतिहास आणि डेटा-आधारित अंतर्दृष्टी व्यवसायांना आणि वित्तीय संस्थांना जोखीम मूल्यांकन सुधारण्यास, अंडररायटिंग मजबूत करण्यास आणि माहितीपूर्ण पत निर्णय घेण्यास कशी मदत करू शकतात, यावर या सत्रात लक्ष केंद्रित करण्यात आले.सत्रादरम्यान बोलताना 'रेकॉर्डेंट' चे चीफ प्रॉडक्ट ऑफिसर मनीष घोषाल म्हणाले, "व्यवसायांना आत्मविश्वासाने निर्णय घेण्यासाठी आणि जोखमीचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी क्रेडिट वर्तणुकीबाबत अधिक स्पष्टता असणे आवश्यक आहे. डेटावर आधारित क्रेडिट मूल्यांकन संस्थांना जोखीम लवकर ओळखण्यास, पोर्टफोलिओची गुणवत्ता सुधारण्यास आणि शाश्वत व्यावसायिक वाढीस मदत करू शकते."

विवोने एमआर हेडसेटचा विस्तार केला

नवी दिल्ली : विवो इंडियाने आज विवो नेक्स्ट कार्यक्रमात आपला पहिला मिक्स्ड रिॲलिटी (एमआर) हेडसेट सादर केला. यासह, कंपनीने भारतातील 'स्पेशियल कम्प्युटिंग'च्या क्षेत्रात प्रवेश केला आहे आणि कनेक्टेड व तल्लीन करणाऱ्या अनुभवांसाठी नवीन शक्यता दर्शवल्या आहेत. विवो व्हिजन डिस्कव्हरी एडिशन, डिजिटल सामग्रीशी संवाद साधण्याचे अधिक सुलभ मार्ग तयार करण्यासाठी आणि पारंपरिक स्क्रीनच्या पलीकडील अनुभव देण्यासाठी विवोच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमधील क्षमतांना एकत्र आणते.

44 कोटींपेक्षा अधिक व्हिजिट्ससह ऐतिहासिक सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : ॲमेझॉनने आज जाहीर केले की 'ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल 2026' ची ऐतिहासिक सुरुवात झाली असून, या शॉपिंग इव्हेंटची ही आतापर्यंतची सर्वात मोठी सुरुवात आहे. भारत ॲमेझॉन डॉट इन वर खरेदी करत असून, ग्राहक वार्षिक 100% पेक्षा जास्त उत्पादने ऑर्डर करत आहेत. या इव्हेंटच्या सुरुवातीच्या टप्प्यातच 44 कोटींपेक्षा अधिक व्हिजिट्सची नोंद झाली आहे, जी ॲमेझॉन डॉट इन च्या इतिहासातील सर्वोच्च आहे. भारतातील ग्राहक सणासुदीच्या वस्तू, दैनंदिन गरजा आणि स्मार्टफोन, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन, ब्युटी, घर, किचन व इतर अनेक श्रेणींमध्ये अपग्रेड्सची खरेदी करत आहेत.या दमदार सुरुवातीतून देशभरातील वाढता सहभाग दिसून येतो; भारतातील प्रत्येक पिन कोडवरून ग्राहकांनी ऑर्डर्स दिल्या आहेत. एकूण व्हिजिट्सपैकी 72% पेक्षा जास्त व्हिजिट्स पहिल्या 9 महानगरांच्या पलीकडून आल्या, ज्यावरून संपूर्ण 'भारतात' ऑनलाइन खरेदीचा वाढता विस्तार स्पष्ट होतो. Amazon.in वर पहिल्यांदा खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या जवळपास 100% ने वाढली, तर ॲमेझॉन शॉपिंग ॲपने सामान्य दिवसाच्या तुलनेत 5 पट अधिक डाऊनलोड्ससह एका दिवसातील आतापर्यंतची सर्वोच्च डाऊनलोड्सची नोंद केली.

शेतकऱ्यांसाठी नव्या वीज पारेषण जाळ्यासोबत प्रगतीची संधी

धुळे :शेताच्या मध्यभागी वीज पारेषण टॉवर उभा राहिला, तर शेती थांबते का? याचे उत्तर आहे —नाही!धुळे जिल्ह्यात वीज पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना बळसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पाच्या माध्यमातून एक महत्त्वाचा संदेश समोर येत आहे. तो म्हणजे, शेती आणि वीज पारेषण यंत्रणा यांचा सहअस्तित्वातून विकास शक्य आहे. शेती हा धुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे शेतजमिनीतून वीज पारेषण वाहिन्या जाताना त्याचा शेतीवर काय परिणाम होईल, हा प्रश्न शेतकरी आणि जमीनधारकांसाठी स्वाभाविक आहे. टॉवर आणि वीजवाहिन्यांच्या उपस्थितीमुळे शेती करण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल का, ही सर्वात सामान्य चिंता आहे.मात्र, वीज पारेषण टॉवर आणि वाहिन्या शेतातून गेल्या म्हणजे संपूर्ण शेतजमीन शेतीसाठी अनुपयोगी ठरते, असे नाही.

राजेंद्रबाबुजी दर्डा यांना 'संस्कारमूर्ती, सरस्वती आराधक, महाराष्ट्र भूषण व ज्ञानप्रभाकर' या उपाधींनी सन्मानित

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्राचे माजी शालेय शिक्षणमंत्री व सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दर्डा यांना जैन शिक्षण संस्थेच्या पी यु जैन विघालय वतीने 'संस्कारमूर्ती', 'सरस्वती आराधक', 'महाराष्ट्र भूषण' आणि 'ज्ञानप्रभाकर' या सन्माननीय उपाधींनी गौरविण्यात आले. पी. यू. जैन यांच्या जयंतीनिमित्त जैन शिक्षण संस्था संचलित पी. यू. जैन माध्यमिक विद्यालय, राजाबाजार आणि लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रौप्यमहोत्सवी आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा व पारितोषिक वितरण सोहळ्यात हा सन्मान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरच्या सकल जैन समाजाच्या शैक्षणिक, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत संस्थेच्या वतीने राजेंद्रबाबु दर्डा यांना या उपाधींनी अलंकृत करण्यात आले. यावेळी संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सुचिता अतुल सेठी यांच्या हस्ते झाले. आंतरशालेय प्रश्नमंजुषा अतुल सेठी परीवारचे गत 25 वर्षांपासून पासुन योगदान मिळत आहे. स्व.माणिकचंद सेठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ निर्माण करण्यात आलेल्या कक्षाच्या निमित्ताने श्री. संस्था कार्यालयाच्या उभारणीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या महावीर सेठी, प्रकाश सेठी, राजेंद्र सेठी, कल्पना सेठी संगीता सेठी यांचा राजेंद्र बाबुजी दर्डा यांच्या शुभहस्ते गौरवपत्र प्रदान केले याप्रसंगी लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन आशिष अग्रवाल, राजेश बलदवा, राहुल गोसावी, अल्केश रावका, मनीष धूत, नितीन बोहरा आणि सुचेता सेठी यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप व पारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान महावीर सेठी यांनी भूषविले .संस्थेच्या सचिव आशादेवी काला, उपाध्यक्ष सुनील सेठी, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बडजाते, सहसचिव सुनील अजमेरा, सावन चुडीवाल, शैलेश पाटणी, राजेश कासलीवाल, रश्मी पाटणी,उपस्थित होते यावेळेस राजेंद्र बाबुजी दर्डा याना दिलेल्या उपाधीचे वाचन देवेंद्र काला यानी केले माध्यमिक

विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय एस. पाटोदी यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेची पार्श्वभूमी, स्वरूप आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. सलग २५ वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीला, आत्मविश्वासाला आणि बौद्धिक विकासाला चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी कार्तिकी गायकवाड आणि पूनम गवळी यांनी आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच जलसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या भारुडाचे राजेंद्र दर्डा यांनी विशेष कौतुक केले.

संस्थेचे पदाधिकारी व मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाला संस्थापक सदस्य वर्धमान पांडे, ललित पाटणी, देवेंद्र काला, महावीर ठोळे, दिलीप बाकलीवाल, प्रकाश कासलीवाल, संजय कासलीवाल, पुष्पा बडजाते, वैभव काला, संतोष पापडीवाल, शैलेश चंदिवाल, भरत पापडीवाल, शरद दांडगे, गुलाबचंद बोराळकर, अमित काला, समय चुडीवाल आणि राजेश चुडीवाल उपस्थित होते.

संजय व्यापारी, सुवर्णा शहा, उषा कासलीवाल, प्राथमिक मुख्याध्यापिका कविता ठोळे ,भारती देशमुख, शर्मिला जैन, अजय पहाडे, सुलभा आहेरकर, दर्शना पाटणी, प्रियंका कासलीवाल, रचना कासलीवाल, मनीषा पाटील, विजय चौधरी आणि मंजुषा तुंगावकर यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पाटणी यांनी केले. पहिल्या सत्राचे आभार महावीर संगवे यांनी, तर समारोप सत्राचे आभार सावन चुडीवाल यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल शाह, नीरज कासलीवाल, त्रिशला वायकोस, गणेश चौधरी, पवन तुपे, किशोर तुळशीबागवाले प्रफुल्ल झांजरी यांनी तांत्रिक सहकार्य केले. यावेळी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानि दिली

देवीच्या संगीतबद्ध आरती पठण स्पर्धेचे 21 ऑक्टोबरला आयोजन

विश्व हिंदू परिषद आणि श्री रेणुका देवी संस्थानचा संयुक्त उपक्रम; विजेत्यांना रोख पारितोषिके

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम, महिला विभाग आणि श्री रेणुका देवी मंदिर संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ऑक्टोबर रोजी देवीच्या संगीतबद्ध आरती पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता एन-९, जळगाव रोड येथील श्री रेणुका देवी मंदिरासमोरील मंडपात ही स्पर्धा होणार आहे.

नवरात्रोत्सवात घरोघरी आणि मंदिरांमध्ये देवीच्या आरत्या तालबद्ध पद्धतीने म्हटल्या जातात. नवरात्र काळात महिलांची व्यस्तता लक्षात घेऊन उत्सवानंतर दुसऱ्याच दिवशी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांना आपल्या गायनकलेचे सादरीकरण करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे.

स्पर्धेसाठी 'विपुल दयाघन गर्जे तव हृदयांबरी श्री रेणुके हो', 'लो लो लागला अंबेचा भेदाभेद कैचा' आणि 'अश्विन शुद्ध पक्षी अंबा बैसे सिंहासनी हो' या तीन आरत्यांपैकी एक आरती निवडून सादर करावी लागणार आहे. प्रत्येक संघात पाच ते सात सदस्य असणे आवश्यक असून वादकांची संख्या स्वतंत्रपणे ग्राह्य धरली जाणार आहे. प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी पाच मिनिटांचा वेळ देण्यात येईल. स्पर्धकांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहणार आहे.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या संघाला ५ हजार १०० रुपये, द्वितीय क्रमांकाला ३ हजार १०० रुपये आणि तृतीय क्रमांकाला २ हजार १०० रुपये रोख पारितोषिक देण्यात येईल. याशिवाय दोन उत्तेजनार्थ पारितोषिके आणि सर्व सहभागी संघांना प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत.

इच्छुक संघांनी १९ ऑक्टोबरपर्यंत नावनोंदणी करावी. यासाठी स्वाती जोशी (९९२२७७३६६९), स्नेहल पांडव (९१५८२९६९९९), मोनाताई राजपूत (९८५०५६८८७३) आणि क्रांती देशमुख (९८५०००४५३९) यांच्याशी संपर्क साधावा. महिलांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत महिला विभागप्रमुख राजश्री भिते, सहप्रमुख अनुराधा पुराणिक तसेच श्री रेणुका देवी मंदिर संस्थानचे अध्यक्ष सतीश वैद्य, सचिव सुधीर पाटील आणि सांस्कृतिक विभागप्रमुख सुनील खोचे यांनी केले आहे.

निखिल चव्हाण यांचे एका वर्षाचे मानधन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मानधनासह बैठक भत्ता मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय; जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांना पत्र

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने जिल्हा परिषद गणोरी गटाचे सदस्य निखिल कल्याणराव चव्हाण यांनी आपल्या एका वर्षाच्या मानधनासह बैठक भत्ता मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पा. गलांडे यांना पत्र देऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा आणि त्यांना सावरण्यासाठी हातभार लागावा, या सामाजिक भावनेतून चव्हाण यांनी हा निर्णय घेतला आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून मिळणाऱ्या मानधनाचा उपयोग संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी करण्याच्या त्यांच्या निर्णयातून सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनशीलता दिसून येते. त्यांच्या या निर्णयामुळे इतर लोकप्रतिनिधींनाही सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या वेळी जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सचिन गरड पाटील, जिल्हा परिषद सदस्य मनोज पाटील गायके, दीपक भाऊ राजपूत आणि संतोष भाऊ जाधव उपस्थित होते. चव्हाण यांच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

तुळजापूरमध्ये मोरारी बापूंची रामकथा; तुळजा भवानीच्या आध्यात्मिक वारशाचा गौरव

भारत स्वस्तिक यात्रेअंतर्गत आयोजन; सत्य, प्रेम, करुणा आणि धर्माच्या मूल्यांवर चिंतन

तभा वृत्तसेवा

तुळजापूर : भारत स्वस्तिक यात्रेअंतर्गत पूज्य मोरारी बापू यांच्या रामकथेचे आयोजन १४ ऑक्टोबर रोजी तुळजापूर येथे करण्यात आले. तुळजा भवानी मंदिरामुळे देशभरात प्रसिद्ध असलेल्या या शक्तिपीठाच्या भूमीत रामकथेच्या माध्यमातून भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा गौरव करण्यात आला. देवी उपासनेची समृद्ध परंपरा असलेल्या तुळजापूरला महाराष्ट्राच्या धार्मिक आणि ऐतिहासिक जीवनात विशेष स्थान आहे.

तुळजा भवानी मंदिर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदेवता म्हणूनही देवीची श्रद्धेने पूजा केली जाते. श्रद्धा, धैर्य, कर्तव्य आणि धर्मरक्षण यांचा संदेश देणाऱ्या या परंपरेचा उल्लेख मोरारी बापू यांनी रामकथेदरम्यान केला. तुळजापूरमधील कल्लोळ तीर्थ, गोमुख तीर्थ, पापनाशी तीर्थ, घाटशिला मंदिर आणि काळभैरव मंदिर या धार्मिक स्थळांचाही या परिसराच्या आध्यात्मिक वारशात महत्त्वाचा वाटा आहे.

मोरारी बापू यांनी स्वस्तिक यज्ञकुंडाचे महत्त्व स्पष्ट करताना ते मांगल्य आणि सामूहिक कल्याणाचे प्रतीक असल्याचे सांगितले. रामचरितमानसाच्या संदर्भातून त्यांनी साधुमत, लोकमत, वेदमत आणि वेदांचे सार या चार दृष्टिकोनांवर भाष्य केले. लोकमताला संतांचे ज्ञान आणि धर्माच्या तत्त्वांचे मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. स्वस्तिकाच्या विविध अर्थांचा ऊहापोह करताना त्यांनी 'भगवद्गोमंडल' या विश्वकोशीय ग्रंथाचाही उल्लेख केला.

भारताच्या विविध आध्यात्मिक परंपरांना सनातन धर्माच्या समान मूल्यांद्वारे जोडणे, हा भारत स्वस्तिक यात्रेचा प्रमुख उद्देश आहे. कन्याकुमारीपासून केदारनाथाच्या दिशेने सुरू असलेल्या या यात्रेत देशातील विविध तीर्थक्षेत्रे आणि सांस्कृतिक परंपरांचा परिचय करून दिला जात आहे.

मिराज ग्रुपचे अध्यक्ष आणि संतकृपा सनातन संस्थानचे व्यवस्थापकीय विश्वस्त मदन पालीवाल यांनी सांगितले की, तुळजापूरसारख्या पवित्र स्थळांच्या माध्यमातून देशाच्या विविध भागांना जोडणारा समान आध्यात्मिक वारसा अधोरेखित करण्याचा यात्रेचा प्रयत्न आहे.

संतकृपा सनातन संस्थानतर्फे मोरारी बापू यांच्या मार्गदर्शनाखाली या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे नऊ हजार किलोमीटरच्या या प्रवासात जवळपास ९०० भक्त दोन विशेष रेल्वेगाड्यांमधून सहभागी होत आहेत. यात्रेदरम्यान आयोजित रामकथा सर्वांसाठी खुल्या असून, प्रत्येक ठिकाणी मोफत शाकाहारी सामुदायिक भोजनाची व्यवस्थाही करण्यात येत आहे. सत्य, प्रेम आणि करुणा या मूल्यांचा संदेश देणारी तुळजापूरमधील रामकथा यात्रेतील महत्त्वाचा टप्पा ठरली.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील कृष्णा खंडेलवाल व श्रद्धा गायकवाड यांचे यश

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑक्टोबर

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,सोयगाव येथील १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी कृष्णा खंडेलवाल याने जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग (इनलाईन) स्पर्धेत प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) पटकावून एक मोठी कामगिरी केली आहे. तसेच १२ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी श्रद्धा गायकवाड हिने जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग (इनलाईन) स्पर्धेत द्वितीय क्रमांक (रौप्यपदक) पटकावून एक मोठी कामगिरी केली. आहे.या दमदार कामगिरीसह दोघांची विभागस्तरीय (Division Level) स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपराचार्य डॉ.रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच खेळाडूंना मार्गदर्शन डॉ.निलेश गाडेकर,प्रा.शेख तौफिक यांनी केले.त्यांच्या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात 'अभिजात मराठी भाषा : वर्तमान आणि भविष्य' विषयावर विशेष व्याख्यान संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑक्टोबर : अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६ अंतर्गत दि.१६ शुक्रवार रोजी 'अभिजात मराठी भाषा - वर्तमान आणि भविष्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख व्याख्याते दौलतसिंग परदेशी यांनी 'अभिजात मराठी भाषा - वर्तमान आणि भविष्य' या विषयावर विचार मांडले. मराठी भाषेची ऐतिहासिक परंपरा, तिचे वर्तमानातील स्थान आणि आधुनिक काळातील आव्हाने यांवर त्यांनी प्रकाश टाकला. मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. अभिजात भाषेचा दर्जा ही मराठी भाषेसाठी अभिमानाची बाब असून, तिच्या विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून वाचन, लेखन आणि साहित्यसंवर्धनाची परंपरा समृद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.रमेश औताडे यांनी प्रास्ताविकातून अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा, तिची साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या संधींचा उल्लेख त्यांनी केला. तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रचार-प्रसारासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ज्योती स्वामी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी सिरसाट यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रकटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २१०/२०२६. नि. क्रं.

१. जगन बाबुलाल माळी, वय ३५ वर्षे, धंदा शेती रा. वडगांव तिग्जी, ता सोयगांव जि छ संभाजीनगर २. गोरख बाबुलाल माळी, वय २९ वर्षे, धंदा शेती रा. वडगांव तिग्जी, ता सोयगांव जि छ संभाजीनगर

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बाबुलाल यमा माळी यांचा दिनांक २०/११/२०१७ रोजी वडगांव तिग्जी येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत बाबुलाल यमा माळी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १३/१०/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १९/११/२०२६

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सह. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

जाहिर प्रकटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०९/२०२६. नि. क्रं.

१. मिराबाई रमेश पाटील, वय ५३ वर्षे, धंदा शेती सवतखेडा ता. जामनेर जि. जळगांव

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत कडुबा संपत चौधरी व जनाबाई संपत चौधरी यांचा दिनांक १२/०८/२०१२ व १०/०६/२०२६ रोजी आमखेडा व वसतखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत कडुबा संपत चौधरी व जनाबाई संपत चौधरी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १३/१०/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २०/११/२०२६

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सह. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

जाहिर प्रकटन

मा. विद्यमान प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सोयगांव यांचे न्यायालयात,

फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९५/२०२६.

अर्जदार - १)लिलाबाई सुखदेव हातोळे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. फर्दापुर, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.

विरुद्ध.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत फर्दापुर कार्यालय, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.

प्रकरण :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये ....

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी ॲड. स्वप्निल र. सुरळकर यांच्यामार्फत मा. न्यायालयात कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये जन्म नोंद आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नामे लिलाबाई पिता झिपरु वाघ (लग्नानंतरचे नांव-लिलाबाई सुखदेव हातोळे) यांचा जन्म दिनांक १५/०८/१९५८ रोजी मौजे फर्दापुर, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे झालेला असुन अज्ञानामुळे जन्माची नोंद तत्कालीन वेळेत ग्रामपंचायत फर्दापुर येथे झालेली नाही. त्यामुळे जन्म नोंद आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या अर्जास उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जावर योग्य ते आदेश पारीत केल्या जाईल याची नोंद असु दयावी.

आजरोजी दिनांक १७/१०/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ३०/११/२०२६.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

जाहीर प्रगटन

मा.तिसरे सह दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. 743/2026 — पुढील तारीख 20/11/2026

अर्जदार :1) सत्यभामाबाई अंबादास झगरे, 2) पोपटराव अंबादास झगरे,रा.प्लॉट नं. 115, खंडसरी परिसर, बालाजी नगर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद 3) किशोर अंबादास झगरे, रा.रो हाऊस नं. बी/09, गट नं. 126/पी, सम्यक गार्डेनिया, तिसगाव, औरंगाबाद 4) अलका रावसाहेब कावले, रा.शहर टाकळी, ता. शेवगाव, जि. अहमदनगर 5) मिनाताई शांताराम शिंदे, रा. बेल्हेकरवाडी, ता. नेवासा जि. अहमदनगर 6) विमल प्रकाश उंडे,रा.उंडे वस्ती, जुना कणगर रोड, राहुरी बु. ता.राहुरी जि. अहमदनगर 7) जानका नारायण झगरे, 8) राजदिप नारायण झगरे, रा.पाडळसा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद 9) अक्षय नारायण झगरे,अर्जदार नं. 1. 7 व 9 रा. बांभुळगाव नांगरे, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी असुन अंबादास किसनराव झगरे यांचा दि.23/07/2024 रोजी मौजे बाभुळगाव नांगरे ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला आहे. तसेच मयत अंबादास किस नराव झगरे यांची आई नामे लक्ष्मीबाई किसनराव झगरे आणि वडील नामे किसनराव रखमाजी झगरे यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत अंबादास किसनराव झगरे आणि अर्जदार नं. 1 हे आपसात पती पत्नी होते त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं 2 ते 6 आणि मयत नारायण अंबादास झगरे यांचा जन्म झाला असुन मयत अंबादास किसनराव झगरे यांची अर्जदार नं. 1 हि विधवा पत्नी, अर्जदार नं. 2 ते 6 आणि मयत नारायण अंबादास झगरे हे मुले व मुली आणि अर्जदार नं. 7 हि सुन आणि अर्जदार नं. 8 व 9 हे नातु आहेत.मयत अंबादास किसनराव झगरे यांचे नमुद वारसांपैकी वारस / मुलगा नामे नारायण अंबादास झगरे यांचा दि. 10/07/2021 रोजी मौजे बाभुळगाव नांगरे, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत नारायण अंबादास झगरे यांचे पश्चात अर्जदार क. 7 पत्नी, अर्जदार क. 8 व 9 मुले या प्रमाणे वारस आहेत. मयतांना वर नमुद अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन वर नमुद अर्जदार यांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक 16/10/2026 रोजी दिले.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक. — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

अग्रलेख

अगतिकतेचा गैरफायदा घेणारी बांडगुळे

प्रत्येक व्यक्ती ही व्यापारी नसते, पण प्रत्येक व्यक्ती ग्राहक नक्कीच असते. सर्व व्यापारीही एकप्रकारे ग्राहकच असतात. त्यांना आपल्या दैनंदिन जीवनात इतर काही वस्तूंची खरेदी करावीच लागते. असे असले तरी व्यापारी हा कधीच ग्राहकाच्या बाजूने विचार करत नाही, अशी परिस्थिती भारतात तरी आहे. व्यापारी आपल्याच नफ्या-तोट्याचा विचार सदैव करीत असतो. सन्माननीय अपवाद वगळता बहुतांश व्यापारी ग्राहकांचे शोषण करतात, भरमसाट नफा घेतात, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करतात, कमी दर्जाचा वा भेसळयुक्त माल विकतात, असे आरोपही केले जातात. या पृष्ठभूमीवर औषधांच्या महागड्या किमतींवरून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अभिप्रायावर औषधी उत्पादक क्षेत्रात खळबळ उडणे स्वाभाविक आहे. कर्करोगाच्या उपचारात आवश्यक असलेल्या एका औषधाचा उत्पादन खर्च फक्त २७०० रुपये असताना त्याची विक्री तब्बल २७ हजार म्हणजे दहापट अधिक दराने होते, हे समोर आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली, हे योग्यच झाले. औषध उत्पादक क्षेत्रात सर्वांत जास्त नफेखोरी होते. पण, त्या क्षेत्रातली लूटमार रोखायला कुणीही तयार नाही. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने त्यात लक्ष घातले हे उत्तमच.

सर्वोच्च न्यायालयाने कान पिरगाळल्यानंतर केंद्र सरकारने कर्करोगाच्या औषधावर व्यापारी आणि विक्रेत्यांना जास्तीत जास्त ३० टक्के नफा घेता येईल, असे आदेश काढले, अशी माहिती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिली. यामुळे देशातील जनतेची वर्षाला २५०० कोटींची बचत होईल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. हा आकडा विचारात घेतला तर आतापर्यंत या औषध कंपन्यांनी किती प्रचंड लूट केली असेल, याची कल्पना करता येते. हा विषय फक्त कर्करोगाच्या औषधापुरता आहे आणि तरीही हा आकडा एवढा मोठा! वैद्यकीय क्षेत्रात विशेषतः खाजगी रुग्णालयातून होणारी लूट हा आधीपासूनच चर्चेचा विषय. खाजगी डॉक्टर इस्पितळ चालवितात आणि औषधाचे दुकानही. एखाद्याकडे औषधाचे दुकान नसेल तर त्याचे बाहेरचे दुकान मात्र ठरलेले असते. सगळीकडे सेटिंग आणि नफेखोरी. यात मरण होते सामान्यांचे. घरातला कुणीही रुग्णालयात दाखल झाला घर अस्वस्थ होते. त्याला वाचवण्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते. आयुष्यभराची पुंजी ते खर्च करायला तयार असतात. ती संपल्यावर कर्ज काढायला ते मागेपुढे पाहत नाहीत. आणखी गरज पडली, तर घरदार आणि शेतजमीन विकायलाही ते विचार करीत नाहीत. फक्त आपला माणूस जगावा, एवढीच त्यांची अपेक्षा असते. सर्वसामान्य माणसाच्या याच अगतिकतेचा गैरफायदा खाजगी रुग्णालये आणि औषध कंपन्या घेत असतात. वैद्यकीय विमा असेल तर यातून काही प्रमाणात दिलासा मिळतो, हे खरे. पण, असा विमा असलेल्यांची संख्या अद्यापही मर्यादितच आहे. वैद्यकीय विमा असला तरी दुर्धर आजाराच्या प्रसंगी कितपत आर्थिक मदत मिळते, हा आणखी एक मुद्दा. बहुतांश विमा कंपन्यांचा कल कोणतेही छोटे-मोठे कारण सांगून दावा फेटाळण्याकडे वा कमीत कमी भरपाई देण्याकडे असतो. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे दोन्हीकडून मरण होते.

हे सारे लक्षात घेता, कर्करोगाच्या औषधांवर ३० टक्के नफा ठरवला तर अन्य औषधांवर का नाही, असा अतिशय योग्य प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने सरकारला विचारला. कर्करोगाच्या औषधातून औषधी कंपन्या जशी नफेखोरी करतात, तशीच ती अन्य सर्व औषधांतूनही करतातच. ११ रुपयांच्या सलाईनची बाटली बाजारात २७० रुपयांना विकली जाते, तर ५ हजारांचा कार्डियाक स्टेंट २५ हजारांत विकला जातो, याकडे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनीच लक्ष वेधले. कर्करोगाच्या औषधांच्या किमती नियंत्रणात ठेवल्या तर वार्षिक २५०० कोटी रुपयांची बचत होईल. सर्व प्रकारचे आजार व उपचारांवर लागणाऱ्या औषधांच्या किमती सरकारने नियंत्रणात आणल्या तर दरवर्षी एखाद्या छोट्या राज्याच्या अर्थसंकल्पाएवढी बचत होऊ शकेल. अनेकांचे प्राण वाचू शकतात. गेली कित्येक दशके ही लूट सुरू आहे. पण, सामान्य नागरिकांचा कुणीही वाली नाही. सरकारी इस्पितळांची व्यवस्था पुरेशी नाही. तेथेही औषध खरेदीची दलाली होते, याची उदाहरणे आहेत. महागड्या उपचारांच्या वेळी जनतेला दिलासा देण्यासाठी सरकारने आयुष्मान योजना आणली. औषधावर कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी अशीच एखादी योजना सरकारने आणण्याची गरज आहे. आपल्या औषधांची विक्री वाढावी म्हणून औषध उत्पादक कंपन्या, औषधी विक्री प्रतिनिधींच्या माध्यमातून डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू देत असतात. पंचतारांकित हॉटेलातील मुक्कामापासून परदेश दौऱ्यापर्यंतचे आमिष डॉक्टरांना दाखवत असतात. याचे कारण सर्वसामान्य माणसांच्या डॉक्टरांवरील विश्वासात दडले आहे. डॉक्टरने औषधे लिहून दिली की रुग्ण आणि त्याचे नातलग डॉक्टरवर डोळे मिटून विश्वास ठेवतात. डॉक्टर काही चुकीचे करणार नाही, आपल्या हिताचाच निर्णय घेतील, अशी त्यांची खात्री असते. डॉक्टरने लिहून दिलेले औषध कोणत्या कंपनीचे आहे, किती महाग आहे, याच्याशी त्यांना काही देणेघेणे नसते. मोदी सरकारने काही वर्षांपासून जनऔषधी केंद्रे सुरू केली आहेत. बाजारात ५०० रुपयांना मिळणारे औषध तेथे शंभर रुपयांत मिळते. विशेष म्हणजे महागडे औषध आणि या ठिकाणी मिळणारे औषध यांच्या दर्जात आणि गुणवत्तेत फरक नसतो. पण, ब्रँडेड माल विकून प्रचंड नफेखोरी करू पाहणारे लोक त्यातही श्लेष काढतात. त्यामागे नफेखोरीच असते. मुळात हा प्रश्न फक्त औषधांचाच नाही, तर सर्व जीवनावश्यक आणि अन्य वस्तूंच्या किमतीचा आहे. नफेखोरी सर्वच बाबतीत होते. आपल्या देशात अनेक वर्षांपासून एमआरपी म्हणजे कमाल किरकोळ विक्री किंमत अस्तित्वात आहे. ही अतिशय चुकीची पद्धत आहे. मुळात कोणत्याही वस्तूचा विक्री दर निश्चित करताना तिचा उत्पादन खर्च, त्यावरील राज्य आणि केंद्र सरकारचा कर, वाहतूक खर्च आणि योग्य नफा यांचाच विचार केला पाहिजे. आता तर जीएसटी आला आहे. सीजीएसटी आणि एसजीएसटी म्हणजे केंद्र सरकारला मिळणारा आणि राज्य सरकारला मिळणारा असे दोन वेगवेगळे कर स्पष्टपणे नमूद असतात. उत्पादकाकडून कोणतीही वस्तू घाऊक विक्रेत्याकडे येते आणि तेथून ती किरकोळ व्यापाऱ्याला मिळते. या सर्व प्रक्रियेत उत्पादकाचा, घाऊक व्यापाऱ्याचा तसेच किरकोळ व्यापाऱ्याच्या नफ्याची टक्केवारी जाहीर का केली जात नाही? एमआरपी म्हणजे मॅक्झिमम रिटेल प्राईसऐवजी ॲक्च्युअल रिटेल प्राईस (एआरपी) सरकार का जाहीर करत नाही? औषधासह प्रत्येक वस्तूचा उत्पादन खर्च जाहीर करावा, अशी मागणी ग्राहक संघटना अनेक वर्षांपासून करीत आहेत. प्रत्येक स्तरावरील नफ्याची मर्यादा निश्चित झाली पाहिजे. उत्पादकाने-विक्रेत्याने वाजवी नफा घेतलाच पाहिजे. व्यापारी मग तो घाऊक असो की किरकोळ, तोही ग्राहक असतोच. त्याला वाजवी नफा मिळालाच पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. त्यालाही जगायचे असतेच. नफा घ्यायला कोणाचा विरोध नाही, तर प्रचंड नफेखोरीला विरोध आहे. औषधांच्या किमतीबाबतची पुढील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात २७ ऑक्टोबरला आहे आणि यावेळी अन्य औषधांच्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी आपण काय उपाययोजना केली, हे सरकारला सांगावे लागणार आहे. न्यायालयाने सामान्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयात लक्ष घातले, याबद्दल त्याचे अभिनंदन केले पाहिजे. सरकारने देशातील जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपण आतापर्यंत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आणि भविष्यात करणार आहोत, हे सांगितले पाहिजे. सामान्यांच्या अगतिकतेचा गैरफायदा घेणारे सर्व प्रकारचे घटक देशाच्या अर्थकारणावरील बांडगुळे आहेत. त्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून काही तरी ठोस निघावे आणि केंद्र सरकारने त्यावर ठोस अंमलबजावणी करावी, अशीच सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. ■

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

हाच आहे का आदर्श?

आज भारतात एक विचित्र फॅशन आली आहे. स्वतःच्या देशाची परंपरा, इतिहास, संघर्षांकडे डोळेझाक करायची आणि शेजारच्या अयशस्वी आणि हिंसक प्रयोगांना आदर्श म्हणायचे असे धंदे काही लोकांनी चालवले आहेत. काही दिवसांपूर्वीपासून काही तथाकथित पुरोगामी, नागरी हक्कांच्या नावाखाली दुकान चालवणारे लोक उघडपणे म्हणत आहेत की बांगलादेश आमचा आदर्श आहे. ज्या बांगलादेशात गेल्या वर्षभरात सत्ताबदलाच्या नावाखाली जे घडले, ते संपूर्ण जगाने पाहिले. निवडून आलेल्या सरकारला रस्त्यावर हिंसा करून पाडले गेले. त्यानंतर सूडाचा नंगानाच सुरू झाला. घरे जाळली गेली, अल्पसंख्यक हिंदूंवर अमानुष अत्याचार झाले, मंदिरे फोडली गेली, महिलांची अब्रू लुटली गेली, कारखाने लुटले गेले, देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेली. हा आहे का तुमचा आदर्श? हेच मॉडेल तुम्हाला भारतात राबवायचे आहे का?

कॉक्रोच जनता पार्टी ही कधीच न्यायासाठी लढणारी चळवळ नव्हती. हा एक अजेंडा आहे. वर्षानुवर्षे या विचारधारेने एकच काम केले आहे, ते म्हणजे भारताच्या प्रत्येक व्यवस्थेला बदनाम करणे. न्यायव्यवस्था सांप्रदायिक आहे, पोलिस खुनी आहेत, निवडणूक आयोग विकला गेला आहे, सैन्य अत्याचारी आहे. देशात काहीच चांगले नाही, असा सततचा प्रचार हे लोक करत आहेत. कॉक्रोच जनता पार्टी हा त्यांचा नवा मुखवटा आहे. मात्र यामागील चेहरे तेच आहेत. एक गंमत पाहा, जेव्हा याच लोकांना विचारले जाते की तुमच्याकडे पर्याय काय आहे, तेव्हा त्यांच्याकडे उत्तर नसते. त्यांचा पर्याय म्हणजे अराजकता. त्यांचा पर्याय म्हणजे रस्त्यावरची गर्दी... हीच तर विकृती आहे. कायद्याच्या राज्यावर विश्वास असल्याचे नाटक करायचे आणि प्रत्यक्षात कायदाच मानायचा नाही. गुजरातपासून ते आजपर्यंतचा त्यांचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की त्यांना न्याय नकोय, त्यांना निकाल हवा आहे तोही फक्त त्यांच्या सोयीचा. या संपूर्ण विकृतीला वैचारिक खतपाणी घालण्याचे काम प्रशांत भूषण यांच्यासारखे लोक करत आहेत. हे लोक आता उघडपणे रक्तरंजित क्रांतीची

भाषा करू लागले आहेत. लोकशाही मार्गाने, मतपेटीतून बदल होऊ शकत नाही, रस्त्यावर उतरावे लागेल, व्यवस्था उलथवून टाकावी लागेल, असे बेजबाबदार उद्गार ते काढतात. हे अत्यंत धोकादायक आहे. त्यात कॉक्रोच जनता पार्टीची नेता नेहा बोराला भारतात क्रांती घडवण्यासाठी बांगलादेशचा आदर्श घ्यावासा वाटतो. त्यांना थेट प्रश्न विचारावासा वाटतो - नेहा बोरा, बांगलादेशचा आदर्श घ्यावासा वाटतो म्हणजे नेमके काय हवे आहे तुम्हाला? भारतातही बांगलादेशसारखीच रक्तरंजित क्रांती हवी आहे का तुम्हाला? भारताच्या संसदेवर, विधानसभांवर जमावाने हल्ला करावा असे वाटते का? इथेही हिंदूंची घरे जाळली जावीत, मंदिरे फोडली जावीत, हे तुमचे स्वप्न आहे का? तुम्ही आदर्श कोणाचा घेता यावरून तुमची मानसिकता कळते. त्यामुळे ही चळवळ आता उघडपणे हिंसक गोष्टींना पाठिंबा देऊ लागली आहे.

मात्र एक चांगली गोष्ट घडत आहे. आता कॉक्रोच जनता पार्टीला विरोध वाढतो आहे. पूर्वी पत्रकार त्यांना प्रश्न विचारत नव्हते. त्यांच्या एका आरोपावर दिवसभर प्राईम टाईम चालायचा. कारण विद्यार्थ्यांच्या आडून ते आंदोलन करत होते. आता त्यांना सत्तापालट हवा आहे, असे ते स्पष्ट म्हणत आहेत. दीपकेचाही खरा चेहरा लोकांसमोर आला आहे. म्हणून आता चित्र बदलत आहे. सामान्य जनता त्यांना उत्तर देतेय. सोशल मीडियावर, विमानात, रस्त्यावर लोक त्यांच्या प्रामाणिकपणावर संशय घेत आहेत, जाब विचारत आहेत. पत्रकारही आता उलट प्रश्न विचारू लागलेत. आधी एकतर्फी मुलाखती घेतल्या जायच्या. मात्र आता बांगलादेशच्या हिंसेला तुम्ही क्रांती म्हणता का? भारताच्या निवडणुकीवर तुम्हाला विश्वास नाही का? १४० कोटी लोकांनी निवडून दिलेल्या सरकारला तुम्ही हिंसा करून पाडणार का? असे प्रश्न त्यांना विचारल्यामुळे त्यांची बोलती बंद होत आहे आणि त्यांचा विद्रूप चेहरा आणखी समोर येत आहे.

लक्षात घ्या, जर तुमचा आदर्श बांगलादेश असेल, अराजकता, जाळपोळ करणे, मंदिरे फोडणे, अल्पसंख्यकांना मारणे यावर तुमची श्रद्धा असेल, तर तुम्ही औरंगजेबाचे वंशज आहात. त्याचे शासन हे असेच होते. त्याने भारतावर प्रचंड अत्याचार केले. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवत, मराठ्यांच्या पराक्रमाने औरंगजेबाला याच महाराष्ट्रात हताश होऊन जीव गमवावा लागला आहे. आमचे आदर्श हे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. आमचा आदर्श हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. ज्यांनी आम्हाला संवैधानिक मार्ग शिकवला. ज्यांना बांगलादेशचा आदर्श घ्यायचा आहे, त्यांनी ठरवावे - तुम्हाला शिवाजी महाराजांच्या विचारांचा भारत हवा आहे की औरंगजेबाच्या विचारांचा? तुम्हाला मतपेटीतून बदल हवा आहे की रक्ताच्या नद्या वाहून क्रांती करायची आहे? भारताची जनता सुज्ञ आहे. तिने औरंगजेबाला नाकारले आहे आणि शिवाजी महाराजांना हृदयात ठेवले आहे. हीच जनता कॉक्रोच जनता पार्टीसारख्या रक्तरंजित क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्यांना देखील त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. ■

writerjayeshmestry@gmail.com

श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

ज्ञानमाता सरस्वती

सातवी माळ

नवरात्रीच्या नवव्या दिवशी मातेची विविध रूपे श्रद्धेने आणि भक्तिभावाने पूजली जातात. आज मातेचे रूप काळेकुट्ट असून तिचे केस विस्कटलेले असतात. अतिशय भयंकर असे हे रूप असले, तरी माता आपल्या भक्तांना शुभ वरदान देणारी आहे, अशी भाविकांची धारणा आहे. प्रत्येक घरी आपापल्या रीतिरिवाजानुसार मातेची पूजा केली जाते. आज विशेषतः सप्तशती पाठ, जप, हवन अशा विविध धार्मिक विधींद्वारे मातेची भक्ती केली जाते. या भक्तीतून नैराश्य, भूत-प्रेतादी विषयांची भीती दूर होऊन भक्त आत्मनिर्भर होतो, अशी श्रद्धा आहे. काम, क्रोधादी षडरिपूंपासून मुक्ती मिळवून भक्ताला एक वेगळाच पारमार्थिक आनंद प्राप्त होतो.

आजपासून बुद्धीची देवता माता सरस्वती हिचे पूजन पुढील तीन दिवस केले जाते. या उत्सवाला शारदीय नवरात्र असेही म्हटले जाते. ज्ञान, विद्या आणि बुद्धीची अधिष्ठात्री म्हणून माता सरस्वतीला विशेष महत्त्व आहे. तिच्या कृपेने मनुष्याला ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. तेलंगणातील निर्मल जिल्ह्यात गोदावरी नदीच्या काठी महर्षी व्यासांनी आत्मिक ज्ञान आणि तपश्चर्या साधण्यासाठी वाळूपासून माता सरस्वतीची भव्य मूर्ती निर्माण करून तिची बासर क्षेत्री स्थापना केली, अशी आख्यायिका आहे. भारतातील माता सरस्वतीच्या मंदिरांपैकी एक प्रमुख मंदिर म्हणून या मंदिराचा लौकिक सर्वदूर पसरलेला आहे. येथे 'अक्षराभ्यास' नावाचा एक महत्त्वाचा विधी मानला जातो. मुला-मुलींना शाळेत शिक्षणासाठी पाठवण्यापूर्वी येथे विद्यारंभ म्हणजेच अक्षराभ्यासाचा विधी केला जातो. पाटी किंवा कोरी वही घेऊन त्यावर मंदिरातील पुजारी त्या मुलांकडून अक्षर लिहून घेतात. त्यानंतर ती वही देवीच्या चरणांना स्पर्श करून पुन्हा मुलांना दिली जाते. माता सरस्वतीचे हे भव्य मंदिर असून येथे महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वती अशा तिन्ही देवतांचे दर्शन होते. मंदिराजवळच एक उंच टेकडी असून तिच्यावरील एका गुहेत बसून महर्षी व्यासांनी काही काळ तपश्चर्या केली आणि नंतर गणाधीश गणपतीकडून महाभारत लिहून घेतले, अशी आख्यायिका सांगितली जाते. महर्षी वाल्मीकि यांनीही रामायण लिहिण्यापूर्वी याच देवतेचा आशीर्वाद घेतल्याची आख्यायिका येथे मोठ्या श्रद्धेने सांगितली जाते. श्रीगुरुचरित्राच्या चौदाव्या अध्यायाचा लेखनप्रसंगही या पवित्र भूमीशी जोडला जातो. श्री दत्तात्रेय प्रभूंच्या आशीर्वादाने सायंदेव नावाच्या ब्राह्मणाने याच भूमीत थांबून श्रीगुरुचरित्राचा चौदावा अध्याय लिहिला, अशी श्रद्धा आहे. नागपूरचे धर्मभास्कर आणि अभ्यासक श्री सद्गुरुदास महाराज, पूर्वाश्रमीचे विजयराव देशमुख यांनी हे स्थान शोधून येथे दत्तमंदिर उभारले, असे सांगितले जाते.

माहूरच्या पावन भूमीत येण्यापूर्वी संतकवी श्री विष्णुदास महाराज काही काळ याच मंदिरात वास्तव्याला होते. माता सरस्वतीचा कृपाशीर्वाद प्राप्त झाल्यानंतर तिच्या प्रेरणेने ते माहूरला माता रेणुकेच्या सान्निध्यात आले. पुढे माता रेणुकेचे भक्त म्हणून त्यांचा लौकिक सर्वदूर पसरला. माता रेणुकेने त्यांना पूर्ण स्वरूपात दर्शन देऊन त्यांच्या भक्तीला अधिक बळ दिले, अशी भक्तांची श्रद्धा आहे. या प्रसंगाचे सुंदर आणि भावपूर्ण वर्णन कवी विष्णुदास स्वामी यांनी आपल्या भक्तिरचनेत केले आहे -

माझी रेणुका माऊली, कल्पवृक्षाची सावली ।
जशी वासरासाठी गाय, तैशी अनाथांची माई ॥
हाके सरशी घाईघाई, वेगे धावतची पायी ।
आली तापल्या उन्हात, नाही आळस, मनात
माझी रेणुका माऊली ।
खाली बैस, घे आराम, मुखावरती आला घाम ।
विष्णुदास आदराने, वारा घाली पदराने ॥

अशी ही करुणामयी, ज्ञानदायिनी आणि भक्तवत्सल माता सरस्वतीची महती आहे. ज्ञान, विद्या आणि भक्तीचा संगम घडविणाऱ्या या पवित्र क्षेत्राचे महत्त्व केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर भारतीय ज्ञानपरंपरेच्या दृष्टीनेही अनन्यसाधारण आहे. ■

उमरखेड. ९४०३६०८११५

मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

लाचार बाहुले!

महाराष्ट्राच्या राजकारणात ढोंगाला आणि दुटप्पीपणाला कधी नव्हे एवढा महापूर आला आहे. स्वतः सत्तेवर असताना ज्यांनी महाराष्ट्राच्या बळीराजाच्या तोंडाला सलग अडीच वर्षे पाने पुसली, तिजोरीत खडखडाट असल्याचा कांगावा करत मंत्रालयाच्या वातानुकूलित दालनातून बाहेर पडण्याचेही कष्ट घेतले नाहीत, तेच महाभाग आज विरोधी पक्षाच्या बाकांवर बसून शेतकरीहिताचा पुळका दाखवत थयथयाट करत आहेत. रोज सकाळ झाली की महायुती सरकारवर तोंडसुख घ्यायचे, शब्दांचे फुगे हवेत सोडून स्वतःचा पराक्रम सिद्ध करायचा आणि प्रत्यक्षात शेतकरी जेव्हा संकटात होता तेव्हा मात्र हात चोळत बसायचे, ही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कंपूची जुनीच सवय आहे. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण', या म्हणीचे मूर्तिमंत रूप आज उघडेनागडे झाले आहे.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा मिळावा, ऐन दिवाळीच्या सणात बळीराजाच्या घरात अंधार राहू नये, त्याच्या चूल आणि दिव्याची चिंता मिटावी म्हणून महायुती सरकारने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने पाच हजार रुपयांची रक्कम जमा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. पण या निर्णयाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहताच या कंपूच्या पोटात असा काही पोटशूळ उठला आहे की, जणू शेतकऱ्याला मिळालेली ही मदत म्हणजे यांच्या काळजावर झालेला वार आहे. ज्यांनी स्वतःच्या अडीच वर्षांच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांच्या पदरात एक नवा पैसा टाकला नाही, ज्यांनी केवळ पोकळ घोषणांच्या हवेत शेतकऱ्यांना झुलवत ठेवले, ते आज पाच हजार रुपयांच्या मदतीला तोकडी म्हणून हिणवत आहेत. हा केवळ सरकारचा अपमान नसून, संकटाच्या काळात मिळालेल्या घासात समाधान मानणाऱ्या लाखो स्वाभिमानी शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि भावनांचा घोर अपमान आहे. इतिहासाची पाने फार जुनी नाहीत, केवळ पाच-सहा वर्षांपूर्वीचा काळ आठवला तरी या महाभागांचे ढोंग सहज उघडे पडते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी आणि नंतर जेव्हा राज्यात अतिवृष्टीचे संकट आले होते, तेव्हा याच उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कॅमेऱ्यांसमोर मोठमोठ्या गर्जना केल्या होत्या. हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळालीच पाहिजे, शेतकऱ्यांना तत्काळ ५० हजार द्या, अशा मागण्या करून त्यांनी तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारला धारेवर धरण्याचा आव आणला होता. विशेष म्हणजे सरकारमध्ये सत्तेत असताना, त्यानंतर अनैतिक युत्या आणि आघाड्या करून सत्तेच्या सिंहासनावर स्वतः उद्धव ठाकरे विराजमान झाले. स्वतःकडे मुख्यमंत्रिपदाची सूत्रे आली, तिजोरीच्या चाव्या हाती आल्या. मग त्या वेळी त्या ५० हजार रुपयांच्या घोषणेचे काय झाले? सत्तेवर बसल्यावर ती हेक्टरी ५० हजारांची भाषा कोणत्या अडगळीत जाऊन पडली? सलग अडीच वर्षांहून अधिक काळ मुख्यमंत्रिपदाचा उपभोग घेणाऱ्या ठाकरेंना आपल्या संपूर्ण कार्यकाळात शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार सोडाच, साधा दमडीचाही थेट दिलासा देता आला नाही. आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यांच्या सरकारकडे इच्छाशक्ती नव्हती की शेतकऱ्यांविषयी ती कणव केवळ निवडणुकीपुरतीच पुळक्याची ठरली होती? स्वतः मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांच्या खात्यात फुटकी कवडी न टाकणारे, उठसूठ केंद्र सरकारकडे बोटं दाखवणारे हे लोक आज सरकार शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देत असताना कोणत्या तोंडाने प्रश्न विचारत आहेत? नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची मोठी डिंग मारली गेली होती, पण त्या घोषणेचा कागद मंत्रालयाच्या फाईलींमध्येच धूळ खात पडून राहिला. एक रुपयाही बळीराजाच्या खात्यात जमा झाला नाही. उलट शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणि तोंडावर नैराश्य पसरवून हे महाशय शेतकऱ्यांनी 'वर्क फ्रॉम होम' करावे असा अत्यंत बिनडोक सल्ला देत राज्याचा कारभार हाकत असल्याचा आव आणत होते. त्यानंतर जेव्हा महायुतीचे सरकार सत्तेवर आले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांनी ठाकरे सरकारने केवळ हवेत सोडलेली ५० हजारांच्या प्रोत्साहन अनुदानाची योजना शिंदे-फडणवीस सरकारने तत्काळ अमलात आणली. आज नैसर्गिक आपत्तीच्या काळात, दुष्काळ आणि नापिकीच्या चक्रात अडकलेल्या बळीराजाला दिवाळी साजरी करता यावी यासाठी किमान ५ हजार रुपये तरी त्यांच्या हाती पडत आहेत. ज्याच्याकडे काहीच नाही त्याच्यासाठी ही रकमदेखील मोठी आहे. पण कुठलाही धंदा नसताना मातोश्री दोन बांधणाऱ्यांना पैशाची किंमत थोडी कळणार आहे.

शेतकऱ्याला मिळणारा प्रत्येक रुपया हा त्याच्या जगण्याला आधार देणारा असतो, हे वातानुकूलित बंगल्यात बसून राजकारण करणाऱ्याला कसे कळणार? महाराष्ट्रात पाच हजार रुपयांना तुटपुंजे म्हणणारे हे नेते कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या निर्णयावर मूग गिळून गप्प का बसतात? कर्नाटकातील काँग्रेस सरकारने तेथील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना अवघे दोन हजार रुपये देऊन बोळवण केली आहे. तिथे काँग्रेसने शेतकऱ्यांची केलेली ही थट्टा यांना दिसत नाही काय? दोन हजार रुपयांत शेतकरी काय अगरबत्ती लावणार आहे का, असा सवाल कर्नाटक सरकारला विचारण्याची हिंमत यांच्यात का नाही? स्वतःला मर्दाची अवलाद म्हणवून घेणाऱ्यांनी काँग्रेसच्या या लाजिरवाण्या मदतीवर एकदा तरी जाहीरपणे थुंकले पाहिजे होते. पण नाही, दिल्लीत जाऊन सोनिया गांधींसमोर आणि राहुल गांधींसमोर लोटांगण घालणाऱ्या, लाचारीची परिसीमा गाठणाऱ्या या गुलामांची तिकडे तोंड उघडायची लायकी नाही. दिल्लीच्या हायकमांडसमोर मान तुकवून लोटांगण घालायचे आणि महाराष्ट्रात येऊन डिंगा हाकायच्या, हीच यांची एकूण राजकीय लायकी आहे.

आता महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू करून राज्यातील कोट्यवधी माता-भगिनींना दरमहा १५०० रुपयांचा आर्थिक आधार दिला. बहिणींच्या खात्यात थेट पैसे जमा होऊ लागताच यांच्या पोटात असा काही गोळा आला की, यांनी ही योजना कशी बंद पाडता येईल यासाठी न्यायालयात धाव घेण्यापर्यंतचे कारनामे केले. १५०० रुपयांवरून छाती बडवणारे, ही रक्कम कमी असल्याचा कंठशोष करणारे हे महाभाग शेजारच्या कर्नाटकातील काँग्रेसच्या गृहलक्ष्मी योजनेबाबत का बोलत नाहीत? कर्नाटकात महिलांना दरमहा दोन हजार रुपये दिले जातात, तेव्हा यांना काँग्रेस फार मोठी दाता वाटते का? तिथे दोन हजार चालतात, मग महाराष्ट्रात भगिनींच्या खात्यात सन्मानाने जाणारे पैसे यांच्या डोळ्यात का खुपतात? काँग्रेसला जाब विचारण्याची धमक यांच्यात उरलेली नाही. मर्दाची अवलाद असेल तर त्यांनी थेट बंगळुरूकडे बोट दाखवून विचारले पाहिजे प्रश्न विचारले पाहिजे ना.

तेलंगणात शेतकऱ्यांची सर्रास फसवणूक केली जात आहे, बँका शेतकऱ्याच्या दारात जप्तीच्या नोटिसा चिकटवत आहेत आणि तेलंगणातील शेतकरी आक्रोश करत आहेंत. पण तिकडे ढुंकूनही न पाहणारे हे महाभाग महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे तारणहार बनण्याचा आव आणत आहेत. काँग्रेसच्या या लबाडीवर बोलायला यांच्या जीभा टाळूला चिकटतात, कारण सत्तेच्या लालसेपोटी यांनी स्वतःचे स्वाभिमान आणि विचार आधीच दिल्लीच्या चरणी गहाण टाकले आहेत.

घरात बसून शब्दांचे बुडबुडे फोडणाऱ्यांनी आधी आपल्या अडीच वर्षांच्या पापांचे प्रायश्चित्त करावे, काँग्रेसच्या लाचारीतून बाहेर पडून कर्नाटक आणि तेलंगणातील शेतकऱ्यांच्या हक्कांवर बोलण्याची हिंमत दाखवावी. अन्यथा, या दांभिक बडबडीला महाराष्ट्रातील बळीराजा असा सडेतोड तडाखा देईल की, कागदी वाघ कायमचे इतिहासजमा होतील. ■

९२७०३३३८८६

धरणातील पाणीचोरी थांबवा

राज्यात पुढील दहा महिने पुरेल एवढा पिण्याच्या पाण्याचा साठा हवा आहे. तसे नियोजन शासनाने करण्याची नितांत गरज आहे. आजच महाराष्ट्रात सर्वत्र पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई दिसत आहे. मात्र राज्यात ज्या धरणात थोडे फार पाणीसाठे आहेत त्या पाणीसाठ्यांची चोरी मोठ्या प्रमाणात होत आहे. धरणाच्या आजूबाजूला असलेले शेतकरी या धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी चोरून आपल्या पिकांना देत आहेत. राज्यातील प्रत्येक धरणात जवळपास ५०० ते १००० विजेच्या मोटारी बसवून पाणी उचलत आहेत. ही उचल अशीच राहिली तर डिसेंबर महिन्यात राज्यातील सर्व छोटी व मोठी धरणे कोरडी पडतील. माणसांना व प्राण्यांना पिण्यासाठी पाणी मिळणार नाही. शासनाने राज्यातील प्रत्येक धरणातील शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रॉनिक मोटारी जप्त करून त्या ठिकाणी २४ तास पहारा बसवावा आणि ही पाणीचोरी त्वरित थांबवून हे पाणीसाठे राखून ठेवावे. हे पाणीसाठे पुढील उन्हाळ्यात उपयुक्त ठरणार आहेत. पाणी संपले तर पाणी कोठून आयात करणार? त्यापेक्षा आज धरणातील पाणी राखून ठेऊन ते उद्या उद्भवणाऱ्या पाणीटंचाईवर जालीम उपाय ठरू शकतात. शासनाने राज्याच्या धरणातून होत असेलेल्या पाणीचोरीला त्वरित थांबविण्याची नितांत गरज आहे.

धोंडीरामसिंह राजपूत/९४२१३१२२४४

■■■

रस्त्यांवरील पाळीव जनावरांचा प्रश्न सुटेना

''रस्त्यांवरील मोकाट जनावरे होणार दिसेनाशी'' या तरुण भारतात दि. १६ ऑक्टोबरच्या बातमीनुसार नियोजित वाठोडा येथील नंदग्राम प्रकल्पाने शहरातील निराधार भटक्या जनावरांचा प्रश्न सुटणार असल्याचे दिसते. परंतु आजही भर वस्त्यांमधील पाळीव गायी नागपुरातील गजबजलेल्या रामनगर, गोकुळपेठ बाजार, शिवाजी नगर, गांधी नगर या भागात मुक्तपणे वावरत असल्याचे चित्र आहेच. आता ही जनावरे निश्चितच निराधार नाहीत कारण ती गोठे मालकांची जबाबदारी आहे. राहत्या वस्तीतील किंवा लगतच्या परिसरातील असे गोठे बाहेर हलविण्यात आल्याशिवाय हा प्रश्न प्रलंबितच राहील. 'नंदग्राम' प्रकल्पाने पाळीव जनावरांचाही प्रश्न सुटेल का? यावर नागपूर महानगरपालिकेने स्पष्टीकरण दिले तर बरे होईल. सध्या बेजबाबदार गोठे मालकांवर काय कारवाई होते आहे हे काही नागरिकांना कळत नाही. जनावरांचे गोठे अन्यत्र हलविल्याशिवाय अपघातास निमंत्रण देणाऱ्या पाळीव जनावरांचा उपसर्ग कमी होणार नाही हे निश्चित.

राम राजे/९४२१७७९९४५

वाचक पत्रे

■■■

निष्ठेचे मूल्य : समृद्ध नाती आणि राष्ट्राचा आधारस्तंभ

आजच्या वेगवान, तांत्रिक आणि स्वार्थी युगात 'निष्ठा' या मूल्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. निष्ठा ही केवळ एक भावना नसून ते एक पवित्र कर्तव्य आहे, जे कठीण प्रसंगीही माणसाला ध्येयमार्गावरून विचलित होऊ देत नाही. व्यक्ती, समाज, संस्था किंवा देशाप्रति असलेली अढळ श्रद्धा, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीचे भान म्हणजेच निष्ठा.

कुटुंबात परस्पर निष्ठा असेल तर नात्यांमध्ये विश्वासाची समृद्धी येते. आजच्या डिजिटल युगात, जिथे आभासी जगामुळे कौटुंबिक संवाद कमी होत चालला आहे, तिथे एकमेकांप्रतिची निष्ठा आणि गोपनीयता जपण्याची बांधिलकी नाती घट्ट ठेवते. संवाद, निष्ठा आणि गोपनीयता हेच आज कौटुंबिक नाती टिकवून ठेवण्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत. समाजात जेव्हा निष्ठावंत लोक एकत्र येतात, तेव्हा असंवैधानिक विचारांना व अफवांना तिलांजली मिळून सामाजिक सलोखा आणि न्याय प्रस्थापित होतो.

केवळ वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर नोकरी आणि व्यवसायाच्या क्षेत्रातही निष्ठेचे मूल्य तितकेच अनन्यसाधारण आहे. आपण ज्या संस्थेत, संघटनेत किंवा कंपनीत काम करतो, ती संस्था आणि तिची ध्येयधोरणे याच्याशी प्रामाणिक राहणे, कामाची गोपनीयता पाळणे आणि कठीण काळातही संस्थेला साथ देणे हीच खरी व्यावसायिक निष्ठा होय. जागतिक क्रीडाक्षेत्रात देशाला सुवर्णपदक मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या खेळाडूंच्या त्यागात असो, सीमेवर अहोरात्र रक्षण करणाऱ्या जवानांमध्ये असो, की हवामान बदलाच्या काळात निसर्गाचे रक्षण करण्यासाठी पुढे येणाऱ्या स्वयंसेवकांच्या कृतीत असो, हीच राष्ट्रनिष्ठा दिसून येते. अगदी अवकाशात व आकाशात कर्तव्याची पराकाष्ठा करताना, फ्लायदुबईच्या विमानावरील कठीण प्रसंगात स्वतःचा जीव धोक्यात घालून १७७ प्रवाशांचे प्राण वाचवणारे कॅप्टन स्मित मच्छार यांच्या धाडसी कृतीतही हीच कर्तव्याप्रतिची निष्ठा दिसून येते.

निष्ठावंत व्यक्तींचा त्याग, समर्पण, परिश्रम आणि ध्येयासक्ती यामुळेच समाज व देशाचा विकास शक्य होतो. निष्ठा टिकवून ठेवणे आव्हानात्मक असले, तरी सकारात्मक आणि समृद्ध भविष्यासाठी प्रत्येक क्षेत्रात निष्ठा बाळगणे ही काळाची गरज आहे. ■

संजय शरद श्रौती/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

दुष्काळात पाणी,चारा आणि शालेय सुविधांना प्राधान्य द्या

अन्यथा ग्रामपंचायतीवर कारवाई, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचा इशारा, मुलभुत गरजा पुर्ण केल्याशिवाय इतर योजना करू नये

परभणी (प्रतिनिधी):राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींनी उपलब्ध निधीचा वापर करताना पाणीटंचाई निवारण,चारा उपलब्धता, जलसंधारण आणि शाळांमधील भौतिक सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. गावातील या मूलभूत समस्या सोडविल्याशिवाय इतर कोणत्याही योजनेतील कामे करू नयेत. गावांच्या गरजेनुसार निधी खर्च न करणाऱ्या ग्रामपंचायतींवर नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिला.

जिल्हा परिषद सभागृहात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी ग्रामस्तरावर नियोजन करण्यासह जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीला जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, अपर आयुक्त दादासाहेब वानखेडे, सहाय्यक आयुक्त डॉ. ज्ञानोबा मोकाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, प्रकल्प संचालक डॉ. स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप घोन्सीकर यांच्यासह जिल्हा परिषदेतील सर्व विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

दुष्काळ नियंत्रणासाठी केवळ कागदोपत्री नियोजन न करता संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ग्रामस्तरावर जाऊन गावांच्या परिस्थितीची पाहणी करावी. पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि शाळांमधील भौतिक सुविधांशी संबंधित अडचणी ओळखून त्या प्राधान्याने सोडवाव्यात. दुष्काळी उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करावा, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.जलसंधारण आणि टंचाई निवारणाच्या कामांमध्ये स्वयंसेवी संस्था तसेच युवक मंडळांचा सहभाग वाढविण्याचे आवाहनही त्यांनी केले.गावातील नागरिकांच्या गरजांनुसार निधी खर्च करणे आवश्यक असून, मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून अन्य योजनांवर खर्च करण्याची भूमिका प्रशासनाने घेऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले.ग्रामपंचायतींनी गावातील पाणीपुरवठा, जलसंधारण आणि शालेय भौतिक सुविधांच्या गरजा लक्षात घेऊन उपलब्ध निधीचा योग्य विनियोग करावा. ज्या ग्रामपंचायती गावाच्या गरजांकडे दुर्लक्ष करून या महत्त्वाच्या बाबींवर निधी खर्च करणार नाहीत, त्यांच्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जी. श्रीकांत यांनी दिला. बैठकीत पेन्शन अदालत, आश्वासित योजनांचा लाभ, स्थायित्वाचा लाभ, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे, घरकुल योजना आणि जलजीवन मिशनच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकरणे निकाली काढून नागरिकांना योजनांचे लाभ वेळेत मिळावेत, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने आयोजित महिला बचत गटांच्या उत्पादनांच्या स्टॉलला विभागीय आयुक्तांनी भेट दिली. महिलांनी स्वतः तयार केलेल्या विविध उत्पादनांची पाहणी करून त्यांच्या कामाचे कौतुक केले. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या गरजू शेतकऱ्यांच्या मुलींचे विवाह सुलभ व्हावेत, यासाठी प्रशासनाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्याबाबतही विभागीय आयुक्तांनी सूचना केल्या. तालुका किंवा गावस्तरावर अशा कार्यक्रमांचे नियोजन करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. दुष्काळसदृश परिस्थितीत गावांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे, निधीचा योग्य वापर करणे आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे, या बाबींवर विभागीय आयुक्तांनी भर दिल्याने आता ग्राम पंचायत आणि जिल्हा परिषद प्रशासनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

पुर्नचाचणी परिक्षोला विद्यार्थ्यांचा शुन्य प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी): शासकीय संगणक टंकलेखन व संगणक प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०२६ चा निकाल अद्याप जाहीर न झाल्याने नाराज विद्यार्थ्यांनी पुनर्चाचणीवर बहिष्कार टाकला आहे. परभणीतील ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर १६ ऑक्टोबर रोजी परीक्षा सुरू असतानाही एकही विद्यार्थी उपस्थित नसल्याचे चित्र समोर आले. विद्यार्थ्यांच्या या भूमिकेमुळे परीक्षा यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



परीक्षेचा निकाल सुमारे तीन महिने उलटूनही जाहीर झाला नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. त्यातच १६ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत पुर्नचाचणी आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. निकाल जाहीर करण्याऐवजी पुनर्चाचणी घेण्यास विरोध दर्शवत विद्यार्थ्यांनी सामूहिक बहिष्काराचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

प्रमाणपत्र तलाठी भरती, जिल्हा परिषद लिपिक पदभरती तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरते. निकाल रखडल्यामुळे आवश्यक प्रमाणपत्र सादर करताना अडचणी येण्याची भीती विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. पुनर्चाचणीसाठी पुन्हा वेळ, प्रवास आणि आर्थिक खर्च करावा लागणार असल्याने विद्यार्थ्यांवरील ताणही वाढला आहे.

या प्रकरणी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जुलै २०२६ चा प्रलंबित निकाल तातडीने जाहीर करण्याची मागणी केली आहे. पुर्नचाचणीऐवजी निकालाबाबत स्पष्ट निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्याचा विचार करून संबंधित परीक्षा यंत्रणेने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. विद्यार्थ्यांच्या बहिष्कारानंतर प्रशासन निकाल जाहीर करण्याबाबत काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

विभागीय आयुक्त जी.श्रीकांत परभणी दौऱ्यावर आले असता त्यांना माजी आयुक्त सुनिल केंद्रेकर यांच्या फार्म हाऊसला सदिच्छा भेट देवून दुष्काळी परिस्थितीवर पाण्याचे नियोजन व चारा याबद्दल चर्चा केली. यावेळी सीईओ माथुर, उपजिल्हाधिकारी भोसले, तहसीलदार राजापुरे, गटविकास अधिकारी जाधव, पोलीस निरीक्षक थोरात, जि.प.सदस्य दिलीप देशमुख, माणिक हारकळ,आण्णा सावंत, ओंकार देशमुख, दत्तराव चौधरी आदी.

पुढील बैठकीपुर्वी शहरातील अतिक्रमणे हटवा: जी.श्रीकांत

परभणी (प्रतिनिधी): शहरातील सर्व अतिक्रमणे हटवा, अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करा आणि महापालिकेचे स्वउत्पन्न वाढवून आर्थिक स्थिती मजबूत करा, असे सक्त निर्देश विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांनी शुक्रवारी मनपा प्रशासनाला दिले. पुढील आढावा बैठकीपूर्वी शहरातील सर्व अतिक्रमणे हटविण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या दालनात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकासकामे आणि शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला.या बैठकीला जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, विभागीय सहाय्यक आयुक्त देविदास टेकाळे, उपविभागीय अधिकारी भोसले, तहसीलदार संदीप राजापुरे, नगररचना सहाय्यक संचालक आनंद केदार, उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे, उपायुक्त तुकाराम कदम, मुख्य लेखा अधिकारी दाते, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, आवेश हाश्मी, जुबेर हाश्मी, भगवान यादव, अमोल सोळंके, तनवीर बेग, अल्केश देशमुख, सुधीर तेहरा, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, आदनान कादरी आदी उपस्थित होते.

महापालिकेने स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत वाढवून आर्थिक स्थिती भक्कम करावी. मालमत्ता करासह विविध करांची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी वसुली पथकाने घरोघरी जाऊन वसुली करावी, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.मनपाच्या उत्पन्नात वाढ झाल्यास विकासकामांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करणे शक्य होईल, यावर त्यांनी भर दिला. परभणी शहराच्या पाणीपुरवठ्याची परिस्थिती, विद्युत विभागाचे कामकाज आणि आगामी काळातील पाण्याची उपलब्धता याबाबत विभागीय आयुक्तांनी माहिती घेतली.येलदरी आणि रहाटी बंधाऱ्यातून शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा आढावा घेत भविष्यात उपलब्ध पाणी किती काळ पुरेल, याचीही त्यांनी विचारणा केली. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली.

महापालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. शहरातील सार्वजनिक शौचालयांची उभारणी, घंटागाड्यांची व्यवस्था आणि स्वच्छतेच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांना जबाबदारीने कामाला लावावे आणि स्वच्छतेच्या कामात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुर्णेत दसऱ्याला ५१ फुटी रावणाचे दहन होणार

पुर्णा (प्रतिनिधी): विजयादशमीनिमित्त येथील राजे संभाजी मित्र मंडळाच्या वतीने मंगळवार दि.२० रोजी सायंकाळी ८ वाजता जुना मोंढा बाजार मैदानावर खा.संजय जाधव यांच्या हस्ते फटाक्यांच्या आतीषबाजीत ५१ फुटी रावण दहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राजे संभाजी मित्र मंडळाने संस्थापक अध्यक्ष तथा खा. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २१ वर्षांपासून रावण दहनाची परंपरा अखंडितपणे जपली आहे. यंदाही दसऱ्याचे औचित्य साधून ५१ फुटी रावण दहनासह 'विचारांचे सोने लुटण्याच्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम,माजी जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद आणेराव, डॉ.विनय वाघमारे, डॉ.हरिभाऊ पाटील,हिराजी भोसले,काशिनाथ काळबांडे, गजानन हिवरे आदी उपस्थित राहणार आहेत. दसऱ्यानिमित्त आयोजित या भव्य रावण दहन सोहळ्याला पूर्णा शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजे संभाजी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

मांडाखळीत धम्मसोहळ्याची जय्यत तयारी

परभणी (प्रतिनिधी): तथागत भगवान गौतम बुद्धांच्या मानवतावादी विचारांचा प्रसार आणि बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसाराला चालना देण्याच्या उद्देशाने आश्रय सेवाभावी संस्था व गगन मलिक फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य धम्मसोहळ्याच्या सभामंडपाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

मांडाखळी-उमरी परिसरातील नियोजित बुद्ध विहाराच्या दहा एकर जागेत रविवार, १८ रोजी स.१० वा. कठीण चिवरदान, बुद्धमूर्ती वाटप, धम्मदेशना आणि थायलंड येथील भिक्खू संघाच्या वतीने पवित्र परित्राण पाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले.

आश्रय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा महाउपासक डॉ.सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांच्या पुढाकारातून मांडाखळी परिसरात दहा एकर जागेवर भव्य सुवर्ण बुद्ध विहार उभारण्याचे कार्य सुरू आहे. या माध्यमातून बौद्ध धम्माची शिकवण, भगवान बुद्धांचे करुणा, मैत्री, समता आणि बंधुतेचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध धार्मिक व धम्म विषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत.धम्म सोहळ्याच्या सभामंडपाचे भूमिपूजन पूज्य भंते मोगलायन यांच्या उपस्थितीत पार पडले.

दिनेश जोशीचा एमबीबीएस ला प्रवेश

जिंतुर :येथील दिनेश संजय जोशी याने नुकत्याच झालेल्या परीक्षेत यश मिळून हैदराबाद येथे वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळविला आहे.दिनेशने जिद्द,मेहनत, चिकाटीने हे यश संपादन केले. लहानपणापासूनच अभ्यासात सातत्य ठेवून दिनेशने दहावी व बारावीत मेरिटने पास करून वैद्यकीय क्षेत्राची आवड असल्याने त्याने परीक्षेची तयारी केली. नीट परीक्षेत उत्कृष्ट या संपादन करून प्रवेश मिळविला.यशाबद्दल सौ. मीनाताई बोर्डीकर, शैलेश लाहोटी, श्रीमती शितल कच्छवे, प्रशांत राखे, सुग्रीव्ह मुंडे, प्राचार्य बळीराम वाटाणे, अनिल मेटांगळे आदींनी कौतुक केले आहे.

विद्यार्थीनींना मिळाले पाणी नमुने तपासणीचे धडे

परभणी (प्रतिनिधी): जल जीवन मिशनच्या पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत नागरिकांमध्ये स्वच्छ आणि शुध्द पाण्याचे महत्व वाढवण्यासाठी तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विदयार्थ्यांना पाणी तपासणी प्रयोगशाळांची ओळख निर्माण व्हावी तसेच शुध्द आणि पिण्याच्या पाण्याचे महत्व विदयार्थ्यांना लक्षात यावे यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाच्या पाणी तपासणी प्रयोगशाळामध्ये शालेय विदयार्थ्यांना पाणी नमुने तपासणीचे धडे मिळाले.

जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक जयंत गाढे, वरिष्ठ भू - वैज्ञानिक चक्रधर चव्हाण यांच्या सनियंत्रणात शहरातील भारतीय बालविद्या मंदिर शाळेतील विद्यार्थिनींनी येथील पाणी नमुने तपासणी प्रयोगशाळेला भेट दिली. यावेळी प्रयोगशाळेची संरचना, पाणी तपासणी कशी केली जाते तसेच पाण्याला अशुद्ध करणारे विविध घटक तसेच पाणी अशुद्ध होण्याची कारणे इत्यादी बाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी रसायनी सुनील एस.के, पाणी गुणवत्ता तज्ञ अविनाश आरळकर, जिल्हास्तर नियंत्रण रसायनी रवी शिसोदिया, अनु जैविक तज्ञ दुष्यंत करजगावकर, प्रयोगशाळा सहाय्यक निवास खूपसे, मुख्याध्यापक आळंदकर एन व्ही, विभाग प्रमुख शेंडगे बी.बी, सहशिक्षक संगेवार, भारती यांनी विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा भेट आणि मार्गदर्शनासाठी विशेष परिश्रम घेतले.

मुक्तेश्वर दुर्गा मंडळाच्या आरोग्य तपासणी शिबीराला प्रतिसाद

जिंतुर (प्रतिनिधी): नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पांगरी येथील मुक्तेश्वर सार्वजनिक दुर्गा मंडळाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, विविध आजारांची प्राथमिक तपासणी करणे तसेच नागरिकांना आरोग्याबाबत मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

धार्मिक उत्सवांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत मुक्तेश्वर सार्वजनिक दुर्गा मंडळाने आरोग्य तपासणी शिबिराचा उपक्रम राबविल्याने परिसरातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे. सध्याच्या धावपळीच्या जीवनात अनेक नागरिक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वेळोवेळी आरोग्य तपासणी करून संभाव्य आजारांचे वेळीच निदान होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने मंडळाच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिरामध्ये नागरिकांना आरोग्य तपासणीचे महत्त्व, आजारांपासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची काळजी, योग्य आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्याच्या समस्या उद्भवल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा नियमित तपासणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. मुक्तेश्वर सार्वजनिक दुर्गा मंडळाच्या वतीने धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत आहे. नवरात्रोत्सव हा केवळ देवीच्या आराधनेचा उत्सव नसून समाजातील एकोपा, सेवाभाव आणि सामाजिक जबाबदारी जपण्याची संधी असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली. आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनामुळे नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.अशा सामाजिक उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत होते. मुक्तेश्वर सार्वजनिक दुर्गा मंडळ, पांगरी यांच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. यावेळी परभणी येथील डॉ.कृष्णा वैद्यविद्याचार्य पंचकर्म पुणे हे उपस्थित होते. यावेळी गणेश देशपांडे, ओंकार गळे, सोमेश कंठाळे, मुकेश कंठाळे, ज्ञानेश्वर राऊत, गोविंद राऊत, पुरुषोत्तम कंटाळे, विजय कंठाळे व मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जि.प.प्रशालेच्या विद्यार्थ्यांची अग्निशमन विभागाला भेट

पाथरी (प्रतिनिधी): येथील जि.प.प्रशाला (उर्दू) येथील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षणांतर्गत नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाला शैक्षणिक क्षेत्रभेट दिली.

यावेळी अग्निशमन विभागातील खुरम खान, शारेफ खान, बळीराम गावळे, शेख शेरू व राहुल कदम यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन वाहनातील उपकरणे, आग विझविण्याची साधने, अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीतील बचावकार्य यांची माहिती दिली. मुख्याध्यापक हाशमी आदिल अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यासाठी अस्लम खान, डॉ.मुनीब अब्दुल हबीब, शेख मुफस्सील मोहम्मद अब्दुल रहमान, व्यवसाय शिक्षक माधव गोंडगे, मुजम्मील इस्माईल अन्सारी आणि समन्वयक किरण पतंगे यांनी सहकार्य केले.या भेटीमुळे विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षा व आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळाले.

थोडक्यात महत्वाचे.....

मुरघास निर्मितीसाठी २३ ऑक्टोंबरपर्यंत अर्ज करावेत

परभणी: कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व कृषी विभागामार्फत सन २०२६-२७ मध्ये मुरघास निर्मिती प्रात्यक्षिक राबविण्यात येणार आहे. यासाठी बियाणे व मुरघास बॅग आदींसाठी प्रतिएकर ५ हजार ६०० रुपये अनुदान देण्यात येणार असून, एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त एक एकर क्षेत्रासाठी लाभ मिळेल. दूध उत्पादनविषयक प्रशिक्षण घेतलेल्या तसेच गाय किंवा म्हैस असलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह दि.२३ रोजी पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत.अर्जांची संख्या उपलब्ध लक्षांकापेक्षा जास्त झाल्यास सोडतीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने कळविले आहे.

माधवराव पाटील महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

पालम : येथील माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.वाचनाची आवड निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यनिमित्ताने महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथप्रदर्शनात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याशी संबंधित तसेच विविध विषयांवरील पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थी आणि शिक्षकांनी प्रदर्शनाला भेट देऊन पुस्तकांचे अवलोकन व वाचन केले.

इटोली येथे वाचन प्रेरणा दिन साजरा

जिंतुर: तालुक्यातील ईटोली येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत भारताचे ११ वे राष्ट्रपती तथा भारतरत्न डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. आश्रमशाळेतील ३०१ विद्यार्थ्यांनी आश्रमशाळेच्या ग्रंथालयातील आपल्या आवडीच्या ग्रंथांचे सलग एक तास वाचन केले.सध्याच्या सोशल मीडियाच्या युगामध्ये कमी होत चाललेल्या वाचन संस्कृतीला चालना मिळावी व विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी शासनाच्या वतीने आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तथा प्राचार्य रमेश दराडे, प्रमुख मार्गदर्शक प्रकाश हिवरकर आणि प्रा प्रकाश नागरे हे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा पुरुषोत्तम सांगळे यांनी तर आभार खुशाल मुंडे यांनी मानले.

जिल्हास्तरीय स्पर्धेत आयेशा खान व सोनम गायकवाडे यश





परभणी: मनपाच्या वतीने शिवाजी महाविद्यालय येथे आयोजित जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत संत कबीरदास प्राथमिक विद्यालयाच्या आयेशा खान व सोनम गायकवाड या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेतील १४ वर्षांखालील मुलींच्या ८० मीटर हर्डल्स प्रकारात आयेशा अकबर खान हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर सोनम सिद्धार्थ गायकवाड हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थिनींची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व सचिव, शाळेच्या मुख्याध्यापिका अंजुम मॅडम, क्रीडा शिक्षक अन्वर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मराठवाडा हायस्कुलमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

परभणी: एन.व्ही.एस.मराठवाडा हायस्कूल येथे भारताचे माजी राष्ट्रपती,भारतरत्न डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला.प्रमुख वक्ते म्हणून प्रशांत खरवडकर उपस्थित होते,तर अध्यक्षस्थान शाळेचे पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील यांनी भूषविले. यावेळी सहपर्यवेक्षक सुनील रामपूरकर, विश्वास दिवाळकर आदी उपस्थित होते. खरवडकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, वाचन हे ज्ञानप्राप्तीचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात त्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. डॉ.कलाम यांनी वाचन, ज्ञान आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत मजल मारली. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता अवांतर पुस्तकांचे वाचन करावे असे ते म्हणाले. सूत्रसंचालन अभिजीत कुलकर्णी यांनी तर आभार वसंत पुरी यांनी मानले.

थोडक्यात महत्वाचे.....

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

परभणी : येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ माधव नगर विभागाच्या वतीने शनिवार दि.२४ रोजी विजयादशमीचा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहा प्रमुख उत्सवांपैकी एक असलेला विजयादशमीचा उत्सव माधव नगर विभागात वसमत रस्त्यावरील कल्याण नगरातील मारोती मंदिरात सायंकाळी ६.१५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसहकार्यवाह आलोक कुमार हे प्रमुख वक्ते म्हणून तर सेलू येथील उद्योजक अविनाश जयप्रकाश बियाणी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्व संघ स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात सहकुटूंब उपस्थित रहावे, असे आवाहन माधव नगर विभागाचे कार्यवाह अजय हमदापुरकर यांनी केले आहे.

निबंध लेखन व सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद

परभणी: विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, लेखन कौशल्य विकसित व्हावे आणि सामान्य ज्ञानात भर पडावी, या उद्देशाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त परभणी रिडर्स क्लब व गणेश वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निबंध लेखन स्पर्धा आणि सामान्य ज्ञान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या दोन्ही स्पर्धांमध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे, त्यांच्यात वाचन संस्कृती रुजविणे, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित करणे तसेच स्पर्धात्मक परीक्षांची पूर्वतयारी होण्यास मदत करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता. निबंध लेखन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांना शब्दरूप दिले, तर सामान्य ज्ञान स्पर्धेत विविध विषयांवरील प्रश्नांना उत्तरे देत आपले ज्ञान आणि आकलनशक्ती दाखवून दिली. या उपक्रमाचे आयोजन परभणी रिडर्स क्लबचे संस्थापक अनुराज रासकटला यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

नाईक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

पालम : येथील मराठवाडा सार्वजनिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नाईक विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उपस्थित होते. यावेळी प्राध्यापक जामनिक यांनी विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राचा प्रवास सांगितला. त्यांच्या संघर्षमय जीवनाचा, वैज्ञानिक क्षेत्रातील योगदानाचा, देशसेवेचा आणि विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रेरणादायी संदेशांचा परिचय करून दिला. तसेच विद्यार्थ्यांनी कलाम यांच्याप्रमाणे मोठी स्वप्ने पाहावीत, कठोर परिश्रम करावेत, वाचनाची आवड जोपासावी आणि आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानदीप विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

झरी : पद्मपाणी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, ज्ञानदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष डॉ. पंडितराव प्रधान हे तर प्रमुख पाहुणे म्हणून टाकळी (कुं) केंद्राचे केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी देवानंद वाघमारे, प्रभारी मुख्याध्यापक महेंद्र प्रधान यांची उपस्थिती होती.यावेळी महेंद्र प्रधान यांनी आपल्या मनोगतामध्ये भारतरत्न मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून, प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था येथे केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांना अनमोल माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून शालेय ग्रंथालयातील विविध शास्त्रज्ञांची व वैज्ञानिकांच्या पुस्तकांचे वाचन केले.सूत्रसंचालन सहशिक्षक संतोष भालेराव यांनी प्रास्ताविक सहशिक्षक परमानंद इंगोले यांनी तर आभार सहशिक्षक जुनेद इनामदार यांनी मानले.

CHANGE IN NAME

OLD NAME:- PRANJALI SAMBHAJI MULEY
NEW NAME:- PRANJALI SAMBHAJI MULE
ADDRESS:- SANT SENA NAGAR PARBHANI -431401
MO.NO. 9822611890

जिंतुरात खुले तेल पॅकिंग करणाऱ्या तीन कारखान्यावर धाड

लक्ष्मी गोल्ड आणि हेल्दी नेचर ब्रँडचे तेल सील, नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले

रामप्रसाद कंठाळे

जिंतुर : विविध ठिकाणांहून टँकरद्वारे खुले तेल आणून त्याचे स्वतःच्या कारखान्यात पाऊच व कॅनमध्ये पॅकिंग करून स्वतःच्या ब्रँडने विक्री करणाऱ्या जिंतूर शहरातील तीन कारखान्यांवर अन्न सुरक्षा विभागाने संयुक्त कारवाई केली.छत्रपती संभाजीनगर आणि परभणी येथील अन्न सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकाच वेळी ही धडक कारवाई केली. या कारवाईत पॅकिंग केलेल्या तसेच खुल्या तेलाचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. अहवाल येईपर्यंत विक्रीसाठी तयार असलेले तेल सील करण्यात आले असून, त्याच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे.

जिंतूर शहरातील मोंढा रस्त्यावरील मयूर कोकडवार यांच्या लक्ष्मी ट्रेडिंग कंपनीसह औद्योगिक वसाहतीतील रायपत्रेवार यांच्या अथर्व एजन्सीज आणि अन्य एका कारखान्यावर अन्न सुरक्षा विभागाच्या पथकांनी धाड टाकली. या तिन्ही ठिकाणी स्वतंत्र पथके पाठवून तपासणी करण्यात आली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही तपासणी सुरू होती.

लक्ष्मी ट्रेडिंग कंपनीमध्ये विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या 'लक्ष्मी गोल्ड' या ब्रँडच्या तेलाची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी १५ किलो, १५ लिटर आणि एक लिटर पाऊच अशा विविध पॅकिंगमध्ये तेल विक्रीसाठी तयार होते. अधिकाऱ्यांनी पॅकिंगसाठी आणलेले खुले तेल आणि पॅकिंग केलेल्या तेलाचे नमुने घेतले. हे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवाल प्राप्त होईपर्यंत तेलाचे सर्व बॉक्स सील करण्यात आले आहेत. तसेच संबंधितांना तेलाची विक्री न करण्याची ताकीद देण्यात आली.

औद्योगिक वसाहतीतील अथर्व एजन्सीज या कारखान्यातही अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली. या ठिकाणी 'हेल्दी नेचर' या ब्रँडने विक्रीसाठी तयार असलेले १५ किलो, १५ लिटर आणि एक लिटर पाऊचमधील तेल सील करण्यात आले. तेलाचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून, तपासणी अहवाल येईपर्यंत विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

तिन्ही कारखान्यांतील तपासणी व पंचनाम्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती. त्यामुळे प्रत्येक कारखान्यातून नेमके किती किलो किंवा किती लिटर तेल सील करण्यात आले, याची माहिती तत्काळ उपलब्ध होऊ शकली नाही. पंचनामा पूर्ण झाल्यानंतर याबाबत सविस्तर माहिती देण्यात येईल, असे छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी श्रीकांत करकाळे यांनी सांगितले.

लोककलावंत तीन वर्षापासून वंचित

परभणी (प्रतिनिधी): राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेंतर्गत सन २०२४-२५, २०२५-२६ आणि २०२६-२७ या तीन वर्षांतील लाभार्थ्यांची निवड अद्याप न झाल्याने परभणी जिल्ह्यातील लोककलावंत मानधनापासून वंचित आहेत. या प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करून लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी मान्यताप्राप्त लोकसंगीत कलाकार तथा प्रसार भारती, आकाशवाणी परभणीचे कलाकार सुदाम तुकाराम मस्के यांनी विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शासन निर्णयानुसार या योजनेतील लाभार्थ्यांची निवड जिल्हास्तरीय समितीची बैठक घेऊन करणे अपेक्षित आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्रमांक १३८७५/२०२४ मध्ये २४ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आदेशाचे जिल्हाधिकारी, परभणी यांनी अद्याप पालन केले नसल्याचा आरोप मस्के यांनी निवेदनात केला आहे. शासन निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात प्रशासनाकडून विलंब होत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि लोककलावंतांची आर्थिक अडचण लक्षात घेता, मागील तीन वर्षांपासून मानधनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कलावंतांना तातडीने न्याय मिळणे आवश्यक आहे. संबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन जिल्हा प्रशासनाला लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.मानधनाअभावी लोककलावंतांवर आर्थिक संकट ओढवले असून, यंदाची दिवाळीही अंधारात साजरी करण्याची वेळ त्यांच्यावर येऊ शकते, अशी भावना मस्के यांनी व्यक्त केली. यापूर्वी ४ ऑगस्ट २०२६ रोजी स्पीड पोस्टद्वारे निवेदन पाठवूनही कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

परभणी येथील शिवनेरी सुपर स्पेशालिटी व सुर्या आयसीयु हॉस्पिटल येथे पत्नीने पतीला दिलेल्या किडणीचे यशस्वी प्रत्यारोपन करण्यात आले. यावेळी खा. संजय जाधव यांनी उपस्थित राहुन रूग्ण व डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. (छायाः राहुल धबाले, परभणी)

डिघोळ येथे राष्ट्रीय महिला शेतकरी दिन उत्साहात साजरा

सोनपेठ (प्रतिनिधी): महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), परभणी अंतर्गत सर्वोदय लोकसंचालित साधन केंद्र, सोनपेठ आणि कृषी विज्ञान केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने डिघोळ येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात दि. १५ रोजी राष्ट्रीय महिला शेतकरी दिन साजरा करण्यात आला. यावेळी दोनशेहून अधिक बचत गटांतील महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला जिल्हा समन्वय अधिकारी जया नेमाने, कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ. अरुणा खरवडे, डॉ. इम्रान खान आगई आणि सवाईसिंग निठारवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महिला शेतकऱ्यांनी शेतीतील अनुभव, अडचणी आणि समस्यांविषयी मनोगत व्यक्त केले.

कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी गृहविज्ञान, पशुसंवर्धन आणि पीक व्यवस्थापनासंदर्भात प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे श्रम कमी करणे, उत्पादन वाढविणे आणि शेतीपूरक व्यवसायांतून उत्पन्न वाढविण्याचे महत्त्व यावेळी पटवून देण्यात आले. कार्यक्रमाला माविमचे शरद कटारे, सर्वोदय लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापिका नसीम सय्यद, लेखापाल अभिमन्यू भोसले, विलास शिंदे तसेच सहयोगिनी शिल्पा सरनाईक आणि नीता धाकपाडे उपस्थित होत्या. महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी मार्गदर्शन मिळाल्याने कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

वाचन माणसाला समृध्द करते: प्राचार्य पवार

परभणी (प्रतिनिधी): भारतरत्न ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जीवन कार्य तरुणासाठी प्रेरणादायी असून त्यांनी आपल्या जीवनात संशोधनासोबतच वाचनाला व लेखनाला महत्व दिले व त्यांनी आपल्या लेखनातून तरुणासाठी प्रेरणादायी विचार मांडले त्यामुळे तरुणांनी भारतरत्न ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त नियमित वाचनाचा संकल्प करावा कारण वाचन माणसाला समृद्ध करते असे मत प्राचार्य बबन पवार यांनी मांडले.

शारदा महाविद्यालयात माहिती शास्त्र विभाग व मराठी विभागाच्या वतीने भारतरत्न ए. पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बबन पवार तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे उपस्थित होते. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे,कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ. प्रशांत मेने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन खडके, प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रशांत मेने यांनी तर आभार प्रा. डॉ. नवनाथ सिंगापूरे यांनी मानले.

सेवा संकल्प अभियानातंर्गत स्त्री रूग्णालयात १४१ लहान मुलांच्या हृदयाची टुडी ईको तपासणी करण्यात आली. यावेळी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश नखमवार, डॉ. सारिका बडे, डॉ. किशोर सुरवसे, डॉ.रिजवान काजी, डॉ. नरेंद्र वर्मा, डॉ. पंकज सुगावकर आदी.

मानवत तालुक्यातील फळबागा संकटात

मानवत (प्रतिनिधी):तालुक्यात यंदा पावसाने दांडी मारल्याने तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. भूर्गभातील पाण्याची पातळी कमालीची खोल गेल्याने विहिरी आणि कूपनलिकांनी तळ गाठला आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून जोपासलेल्या फळबागा जिवंत ठेवणे शेतकऱ्यांसाठी अशक्यप्राय बनले आहे. ऐन उत्पादनाच्या मोसमातच सिंचनाचा प्रश्न गंभीर बनल्याने तालुक्यातील फळबागधारक शेतकरी प्रचंड आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

दीर्घकालीन आणि शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून शेतकरी मोठ्या आशेने फळबागांची लागवड करतात. मात्र, आगामी काळात पाणी उपलब्ध होणार नसल्यामुळे या बागा आता डोळ्यांदेखत वाळून जाण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकटाची कुऱ्हाड कोसळणार आहे. एकीकडे फळबाग मोठी करण्यासाठी लागवडीपासून खते आणि औषधांपर्यंत झालेला मोठा खर्च वाया जात आहे; तर दुसरीकडे बागा वाळल्यास त्या उपटून शेत मोकळे करण्यासाठी काढणीचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना करावा लागणार आहे. या दुहेरी आर्थिक भुर्दंडामुळे बळीराजाचे कंबरडे पार मोडून निघणार आहे.

कष्टाने फुलवलेल्या बागा जळताना पाहण्याशिवाय शेतकऱ्यांच्या हातात काहीही उरलेले नाही. या भीषण परिस्थितीत शासनाने तात्काळ मानवत तालुक्यातील फळबागांचे पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना विशेष आर्थिक अनुदान व पाणी उपलब्धता आणि वाहतुकीसाठी मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

तालुका कृषी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार संत्रा ७०५ हेक्टर, केळी १०७ हेक्टर, आंबा ५७ हेक्टर, सीताफळ ५३.१ हेक्टर आणि लिंबू ४९.९ हेक्टर क्षेत्रात पसरले आहे. याशिवाय पेरू ३५.४ हेक्टर, पपई ३१ हेक्टर, मोसंबी ११.५ हेक्टर, चिकू ८.६ हेक्टर व डाळिंब २ हेक्टर क्षेत्रात आहे. तालुक्यात सर्वाधिक क्षेत्र संत्रा व केळी पिकाचे असून, याच बागांना पाण्याचा मोठा फटका बसत आहे.

वनामकृवित उभारणार अत्याधुनिक एकात्मिक हवामान निरिक्षक प्रणाली

वनामकृवि व भारत मौसम विज्ञान विभाग यांच्यात सामंजस्य करार, मराठवाड्यातील हवामान अंदाज व कृषी हवामान सल्ला सेवांना मिळणार बळ

परभणी (प्रतिनिधी):मराठवाड्यातील हवामान निरीक्षण, अचूक हवामान अंदाज आणि शेतकऱ्यांसाठी कृषि हवामान सल्ला सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. भारत मौसम विज्ञान विभाग, मुंबई आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, यांच्यात केंद्र शासनाच्या 'मिशन मौसम' उपक्रमांतर्गत एकात्मिक हवामान निरीक्षण प्रणाली उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

ही अत्याधुनिक प्रणाली विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित कृषि हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प येथे उभारण्यात येणार आहे. या प्रणालीअंतर्गत सी-बँड पोलॅरिमेट्रिक डॉप्लर हवामान रडार, मानक हवामान उपकरणांनी सुसज्ज पृष्ठभागीय हवामान वेधशाळा आणि रेडिओसॉन्ड वेधशाळा या तीन महत्त्वपूर्ण सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. रेडिओसॉन्ड प्रणालीद्वारे हवामान फुग्याच्या साहाय्याने वातावरणाच्या उच्च स्तरांवरील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा यांसारख्या हवामानविषयक घटकांची निरीक्षणे घेता येतील.

या सामंजस्य करारप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि आणि मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राचे प्रमुख तथा वैज्ञानिक बिक्रम सिंह उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने विभाग प्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर व हवामान शास्त्रज्ञ डॉ. कैलास डाखोरे, तर भारत मौसम विज्ञान विभागाच्या वतीने शंभू रवींद्रन, महेश बुरटे, पठाण आदिसंह अधिकारी उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी मराठवाड्यात अत्याधुनिक हवामान निरीक्षण सुविधांची उभारणी होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या प्रणालीमुळे हवामानविषयक निरीक्षणांची वैज्ञानिक क्षमता वाढेल. तसेच हवामानातील बदलांचे अधिक प्रभावी विश्लेषण करून शेतीसह विविध क्षेत्रांसाठी उपयुक्त हवामान आधारित सेवा विकसित करण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. बिक्रम सिंह यांनी वनामकृवि येथे उभारण्यात येणारी एकात्मिक हवामान निरीक्षण प्रणाली ही वैशिष्ट्यपूर्ण सुविधा ठरेल, असे सांगितले. या केंद्रामार्फत हवामान निरीक्षण, माहिती संकलन व विश्लेषण आणि हवामान अंदाज निर्मिती यांना चालना मिळण्यासोबतच भविष्यात देशातील अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी हे केंद्र संदर्भ व मार्गदर्शन केंद्र म्हणून विकसित होण्याची क्षमता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सामंजस्य कराराच्या निमित्ताने वनामकृविचे प्राध्यापक व कर्मचारी आणि भारत मौसम विज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये संवादात्मक सत्र आयोजित करण्यात आले.यामध्ये हवामान निरीक्षण, हवामान विषयक माहितीचे संकलन, तिचे विश्लेषण, हवामान अंदाज तयार करण्याची प्रक्रिया आणि विविध हवामानविषयक उत्पादनांची निर्मिती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. हवामानातील अनिश्चितता, पावसाचे बदलते स्वरूप आणि अवकाळी पाऊस यांसारख्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही प्रणाली मराठवाड्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हवामानविषयक अधिक व्यापक निरीक्षणे आणि त्यांचे शास्त्रीय विश्लेषण यांमुळे पेरणी, सिंचन, खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच काढणी यांसारख्या कृषि कामांचे नियोजन करण्यासाठी अधिक उपयुक्त हवामान आधारित सल्ला सेवा विकसित करण्यास मदत होईल. परिणामी, हवामानातील बदलांशी जुळवून घेणारी आणि जोखीम कमी करणारी शेती पद्धती विकसित करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळेल.

पालममध्ये माकडांचा हैदोस, सुरक्षा प्रश्न ऐरणीवर

पालम (प्रतिनिधी): शहरात माकडांचा वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घरांच्या छतांवर, अंगणात आणि सार्वजनिक ठिकाणी माकडांचा उपद्रव वाढत असल्याने नागरिकांना सावधगिरी बाळगावी लागत आहे. घरातील अन्नपदार्थ पळविणे आणि वस्तूंची नासधूस करण्याच्या प्रकारांमुळे रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत.



विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी वनविभाग आणि नगरपंचायत प्रशासनाने संयुक्तपणे पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. माकडांना पकडणे किंवा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करणे आवश्यक असल्यास वन्यजीवविषयक नियमांचे पालन करून प्रशिक्षित पथकाच्या मदतीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालमकरांकडून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

मानांकनासाठी आरोग्य संस्थांनी कामे तातडीने पूर्ण करावीत– जिल्हाधिकारी

हलगर्जीपणा करणाऱ्यांवर होणार कारवाई, आरोग्य विभागाची बैठक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्वॉस) प्राप्त करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, उपकरणे/ साहित्याची उपलब्धता, औषध साठा याबाबतची मागणी व उपलब्धतता खात्रीशीर नोंदवावी. तसेच आरोग्य सेवांचा दर्जा आणि रुग्णाभिमुख कार्यपद्धती यामध्ये सुधारणा करून सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. या कामात हलगर्जीपणा किंवा दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, बालरोग तज्ज्ञ डॉ गोपाल कदम, डॉ. विशाल पवार, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रशांत पुठावार, वैद्यकीय अधीक्षक, सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याबरोबरच, संबंधित आरोग्य संस्थांनी आवश्यक साहित्याची मागणी विहित नमुन्यात अचूकपणे नोंदवावी. अनावश्यक साहित्याची मागणी करू नये. आवश्यक पायाभूत सुविधा आणि साहित्य उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असून, आवश्यक साहित्य येत्या दोन दिवसांत पुरविण्यात येईल, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिली. आरोग्य संस्थांमधील कामांचा दर्जा तपासण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः अचानक भेटी देऊन पाहणी करणार आहेत. पुढील महिन्यात सर्व तालुक्यांतील आरोग्य उपकेंद्रांचीही तपासणी करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेने निर्धारित निकषांनुसार १०० टक्के मूल्यांकनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करावेत. आरोग्य उपकेंद्रांमध्ये आलेल्या रुग्णांना विनाकारण अन्यत्र पाठवू नये, तर उपलब्ध सुविधांनुसार प्राथमिक उपचार करावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. आरोग्य संस्थांमधील सेवा अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक व रुग्णकेंद्री करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने आणि परस्पर समन्वयाने काम करावे. रुग्णांना वेळेत दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने पूर्ण कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पदवीधर निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

निवडणूक अधिकाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण पूर्ण

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

०५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी हिंगोली जिल्ह्यातील संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली असून, जिल्ह्यातील ३६ मतदान केंद्रांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित मतदान अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) प्रगती चौंडेकर, उपविभागीय अधिकारी विकास माने, समाधान घुटुकडे, प्रतिक्षा भुते ,तहसीलदार अश्विनकुमार माने यांच्यासह प्रशिक्षणार्थी अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे मतदान प्रक्रियेचे दुसरे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे , उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर आणि तहसीलदार अश्विनकुमार माने यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत अधिकारी–कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

निवडणुकीशी संबंधित सर्व कामे जबाबदारीने व काटेकोरपणे पार पाडावीत. प्रशिक्षणादरम्यान दिलेल्या सूचनांचे पालन करून निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती गांभीर्याने समजून घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. मतदारांना मतदान करताना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांसाठी उतारमार्ग (रॅम्प), प्रकाशव्यवस्था आणि स्वच्छतागृहांसह आवश्यक किमान भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी हिंगोली जिल्ह्यात क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी–कर्मचारी आणि सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी या सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

विधान परिषद निवडणुकीत मतदान करतांना नियमांचे पालन करा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ०५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ मध्ये मतदान करताना मतदारांनी निर्धारित नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदानासाठी मतपत्रिकेसोबत पुरविण्यात आलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेनचाच वापर करावा. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल किंवा बॉलपेन वापरू नये. मतदाराने प्रथम पसंती दिलेल्या उमेदवाराच्या नावासमोरील 'पसंतीक्रम' या स्तंभात '१' हा अंक लिहिणे आवश्यक आहे. निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या एकापेक्षा जास्त असली, तरी केवळ एका उमेदवाराच्या नावासमोरच '१' हा अंक लिहावा.

मतदारांना निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या एकूण संख्येइतके पसंतीक्रम नोंदविता येतील. उर्वरित उमेदवारांसाठी आपल्या पसंतीनुसार '२', '३', '४' इत्यादी अंक लिहिता येतील. कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर केवळ एकच अंक लिहावा आणि एकच पसंतीक्रम एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर लिहू नये. पसंतीक्रम शब्दांमध्ये न लिहिता अंकांमध्ये दर्शवावेत. यासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपातील भारतीय अंक १,२,३ इ. रोमन अंक इ. किंवा भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये मान्यता प्राप्त असलेल्या कोणत्याही भारतीय भाषेतील अंक वापरता येतील. मतपत्रिकेवर स्वाक्षरी, आद्याक्षरे, स्वतःचे नाव किंवा अन्य कोणतेही शब्द लिहू नयेत. तसेच अंगठ्याचा ठसा उमटवू नये अथवा पसंती दर्शविण्यासाठी 'टिक' किंवा 'क्रॉस' अशी खूण करू नये. मतपत्रिका वैध ठरण्यासाठी कोणत्याही एका उमेदवाराच्या नावासमोर '१' हा अंक लिहून प्रथम पसंती नोंदविणे अनिवार्य आहे. अन्य पसंतीक्रम नोंदविणे ऐच्छिक आहे. त्यामुळे मतदारांनी मतदान करताना या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

हिंगोली– येथील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने आयोजित दसरा महोत्सवाला उदंड प्रतिसाद मिळत असून प्रदर्शनीमध्ये दररोज हजारो नागरिक येत असून प्रदर्शनीमध्ये थाटलेल्या स्टॉलवरून खरेदी करीत आहेत. रात्रीच्यावेळी या प्रदर्शनीचे ड्रोनने घेतलेले नयनरम्य छायाचित्र. छाया– सुनील पाठक

संक्षिप्त वृत्त

ऊस तोडणी यंत्राऐवजी मजुरांमार्फत करा

हिंगोली– जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी साखर कारखान्यांनी ऊस तोडणी यंत्राऐवजी मजुरांमार्फत करावी. तसेच, कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ३० टक्के ऊस चाऱ्यासाठी राखीव ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील पाचही तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या परिस्थितीत जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. ऊस आणि ऊसाचे वाढे हे जनावरांसाठी उपयुक्त चारा असून, साखर कारखान्यांकडून ऊस तोडणी यंत्राद्वारे केल्यामुळे ऊसाचे वाढे शेतातच पडून वाया जातात. त्यामुळे ऊस तोडणी मजुरांमार्फत केल्यास हे वाढे पशुधनासाठी उपलब्ध होऊ शकतील. या अनुषंगाने जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ऊस तोडणी मजुरांमार्फत करावी. तसेच, कार्यक्षेत्रातील ३० टक्के ऊस चाऱ्यासाठी राखीव ठेवावा, जेणेकरून दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्यास मदत होईल आणि चारा टंचाईवर मात करता येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत.

वयोवृध्द दाम्पत्याच्या शेळ्या बळजबरी नेल्या

हिंगोली– सेनगाव तालुक्यातील कापडसिंगी येथील गीताबाई श्यामराव सोळंके व त्यांचे कुटुंबाचा शेळीपालन हा मुख्य व्यवसाय असून दि ५ ऑक्टोबर रोजी मुगसाजी जाधव हे त्यांच्या घरी आले. त्यांनी तुमचा मुलगा संतोष सोळंके याने माझ्याकडून ऊसणे पैसे घेतले. त्यामुळे ९ लहान मोठ्या शेळ्या बळजबरी नेल्या. परंतु त्यातील काही शेळ्या अद्याप गीताबाई यांना परत मिळाल्या नाहीत. संबंधित पोलिस कर्मचारी आणि आरोपी यांनी संगनमत करून त्या गायब केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गीताबाई सोळंके यांनी पोलिस अधीक्षकाकडे तक्रार दिली असून उर्वरित शेळ्या न मिळाल्यास पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सांदीपनीमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

हिंगोली– सांदीपनी पब्लिक स्कूल मध्ये माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुक कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे संचालक सुनील राठोड यांच्या हस्ते डॉक्टर ए .पी .जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर शाळेच्या मैदानात वाचन स्पर्धा घेण्यात आली. यावेळी सौ. पुष्पा सुनिल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोली शहराच्या वतीने विजयादशमी उत्सव व पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

विजयादशमीच्या मुहूर्तावर आपल्या हिंदू समाजामध्ये पराक्रम व शक्ती जागरणाची परंपरा आहे. संघाचा व्यक्ती निर्माणाचा हा प्रवास शतकोत्तर पोहोचला आहे. आपल्या राष्ट्राची सर्वांगीण उन्नती होऊन आपल्या भारतमातेला परमवैभव प्राप्त व्हावे या दिशेने ही वाटचाल सुरु असल्याचे संघाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

विजयादशमी उत्सव व पथसंचलन १८ ऑक्टोबर रोजी संपन्न होणार आहे. संघशताब्दीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या उत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून देवगिरी प्रांताचे सहप्रांत प्रचारक राजेंद्र कोळपे हे मार्गदर्शन करणार आहेत, तर प्रमुख अतिथी म्हणून सनदी लेखापाल सीए राजेश सोमाणी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम रविवार १८ ऑक्टोबर रोजी दुपारी ४.३० वाजता पथसंचलन आणि सायंकाळी ६.०० वाजता उत्सव भारतीय विद्या मंदिर, पोस्ट ऑफिस रोड, हिंगोली येथे होणार आहे. सर्व स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात दंडासहित दुपारी ४.१५ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन शहर संचालक डॉ. पुरुषोत्तम तोष्णीवाल यांनी केले आहे.

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या ८७५ शाळांमध्ये बुक डोनेशन कॅम्प

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व ८७५ शाळांमध्ये 'बुक डोनेशन कॅम्प' आयोजित करण्यात आला.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत चाललेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत शाळांमधील ग्रंथालये समृद्ध व्हावीत व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढीस लागावी, या उद्देशाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या बुक डोनेशन कॅम्प या अंतर्गत राहुरी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून उपक्रमाला प्रोत्साहन दिले.

राहुरी खुर्द येथील शाळेला भेट दिली असता मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी वर्गात जाऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून बाराखडी तसेच इंग्रजी टेन्स (काळ) बाबत प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेतील ज्ञानाची व आकलनाची चाचणी घेतली.

'सेवा संकल्प अभियान' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये लोकसहभागातून पुस्तके जमा झाली आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

श्रमीक वृत्तपत्र विक्रेता संघटनेकडून माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

येथील बस स्थानकात श्रमिक वृत्तपत्र संघटनेतर्फे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त श्रमिक वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. पाऊस, थंडी, वारा अशा कोणत्याही परिस्थितीत पहाटे उठून घरोघरी वर्तमानपत्र पोहोचविण्याचे काम वृत्तपत्र विक्रेते प्रामाणिकपणे करतात. नागरिकांपर्यंत ताज्या बातम्या पोहोचविणाऱ्या या कष्टकरी घटकाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. डॉ. कलाम यांनी बालपणी कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी वृत्तपत्र वितरणाचे काम केले होते. त्यांच्या जीवनातील या पैलूचा गौरव म्हणून दि. १५ ऑक्टोबर हा दिवस वृत्तपत्र विक्रेता दिन म्हणून साजरा करण्याची संकल्पना पुढे आली.२०१२ मध्ये नांदेड येथून या उपक्रमाची सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने १५ऑक्टोबर हा दिवस भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन म्हणून शासनाने अधिकृतरीत्या घोषित करण्याची मागणी करण्यात आली. शासनाडून लवकरच याला मान्यता मिळेल, अशी अपेक्षा संघटनेच्य पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी गणेश क्यातममवार, प्रसाद आर्वीकर, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पाचमासे, सचिव हरीश कीर्तीवार, एस टी महामंडळाचे कर्मचारी जाधव, शेख शकील, एकनाथ पाचमासे, काशिनाथ कदम, सुभाष अपूर्वा, गजानन तळवणकर, महेश बेरुडकर, जावेद पठाण, पांडू भोयर, टापरे, दिलीप अपूर्वा, संजय साबळे व अनेक पेपर विक्रेता उपस्थित होते.

क्रिकेट सामन्यात कोरोना वॉरिअर्स विजयी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १७ ऑक्टोबर

संत नामदेव पोलीस कवायत मैदाननावर सार्वजनिक दसरा महोत्सव समिती आणि पत्रकार क्रिकेट संघाच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी चुरशीच्या क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवात विविध क्षेत्रांतील संघानी सहभाग नोंदवत आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. अतिशय रंगतदार झालेली ही क्रीडा पर्वणी पाहण्यासाठीप्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

या क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते उत्साहात झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संपादक चक्रधर दळवी, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, ॲड. बंटी देशमुख, शिवा अण्णा आणि ज्येष्ठ पत्रकार शरद जयस्वाल आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी खेळाडूंशी परिचय करून घेत त्यांना प्रोत्साहन दिले.

पहिला सामना (कोरोना वॉरियर्स विरुद्ध प्राध्यापक संघ): दिवसातील पहिला सामना 'कोरोना वॉरियर्स' संघ आणि 'प्राध्यापक क्रिकेट संघ' याच्यात अतिशय चुरशीचा झाला. या अटीतटीच्या सामन्यात उत्कृष्ट खेळ करत 'कोरोना वॉरियर्स' संघाने विजय मिळवला.

दुसरा सामना (वकील संघ विरुद्ध नगरपालिका संघ): दुसऱ्या सामन्यात 'वकील क्रिकेट संघ' आणि 'नगरपालिका क्रिकेट संघ' आमनेसामने आले. या लढतीत वकील संघाच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत चमकदार कामगिरी करत सामना आपल्या नावावर केला.

अंतिम/तिसरा सामना (कोरोना वॉरियर्स विरुद्ध वकील संघ): दोन बलाढ्य संघांमध्ये झालेल्या या अंतिम सामन्यात 'कोरोना वॉरियर्स' संघाने 'वकील क्रिकेट संघ' यांचा पराभव करत आपले वर्चस्व सिद्ध केले आणि सामन्यावर आपले नाव कोरले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा; पाणीटंचाई निवारणासाठी सज्ज राहा

पालकमंत्री अतुल सावे यांचे निर्देश

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेता सर्व अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत. काही ठिकाणी कामांना अडथळे येत असल्यास पोलीस प्रशासनाची मदत घेऊन कामे वेळेत पूर्ण करावीत. विद्युत जोडणीअभावी रखडलेली कामे तातडीने सुरू करावीत. तसेच पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त धरणांतील १० टक्के अतिरिक्त पाणीसाठा सुरक्षित ठेवावा आणि ऑगस्ट २०२७ पर्यंतच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री श्री. सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपूर्ण पाणीपुरवठा योजना, शहरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि पशुधनासाठी चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन आणि महानगरपालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाणीपुरवठा योजनांच्या रेट्रोफिटिंगच्या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर लवकरच बैठक घेण्यात येईल. पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित देयकांसाठी आवश्यक निधीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. या देयकांचा निपटारा करण्यासाठी मुंबई येथे बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे पालकमंत्री श्री. सावे यांनी सांगितले. निधीअभावी पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांमध्ये अडथळे येऊ नयेत, यासाठी महसूल, जलसंपदा विभाग, पोलीस, नगर पालिका, महानगर पालिका आणि जिल्हा परिषद या सर्व विभागांनी समन्वयाने काम करुन दुष्काळी परिस्थितीवर मात करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जलजीवन मिशनअंतर्गत जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या तसेच पूर्णत्वाच्या टप्प्यात असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेऊन उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. राज्यस्तरावर प्रलंबित असलेल्या सुधारित पाणीपुरवठा योजना, पाणीटंचाई आराखडा, इसापूर धरणातील उद्धव विहिरीचे काम आणि विद्युत जोडणीची प्रलंबित कामे यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

शहर आणि ग्रामीण भागात पाण्याचा काटकसरीने वापर होण्यासाठी महानगरपालिका व नगरपालिकांनी आवश्यकतेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि पाणीकपात करावी. अनधिकृत नळजोडण्या, पाण्याचा अवैध उपसा आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. रस्त्यावर पाणी वाहून जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. पाणीगळती आढळल्यास तिची तातडीने दुरुस्ती करावी, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

उद्योगांमध्ये प्रक्रिया करून पुनर्वापरासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा योग्य वापर करावा. पुनर्वापरित पाणी बांधकामे आणि रस्त्यांच्या कामांसाठी वापरण्यावर भर द्यावा. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, बोअरवेल पुनर्भरण, नाला खोलीकरण, विहिरींची कामे आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आणि जलतारा योजनेअंतर्गत प्रस्तावित कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईबरोबरच पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध राहील, यासाठी संबंधित विभागांनी नियोजन करावे. मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधील पाणीसाठ्याचा नियमित आढावा घ्यावा. जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागांतर्गत असलेल्या तलावांची सद्यस्थिती तपासून आवश्यक दुरुस्तीची कामे करावीत. जलसंधारणाच्या कामांमधील अडचणी दूर करून पाणीसाठा वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे पालकमंत्री श्री. सावे यांनी सांगितले.

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी सन २०२३ मधील पीकविमा, जलसंपदा आणि जलसंधारण विभागांची प्रलंबित कामे मार्गी लावण्याची आवश्यकता व्यक्त केली. जलजीवन मिशनसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. शेतकऱ्यांच्या पीककर्ज व वसुलीच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे. पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा पुरवठा खंडित होणार नाही, याची दक्षता घ्यावी. महावितरणशी संबंधित प्रश्न सोडवून बंधाऱ्यांच्या दुरुस्तीच्या कामांनाही प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी केल्या. या कामांसाठी आवश्यक निधी मिळविण्याकरिता शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील पीक परिस्थिती, पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, संभाव्य चारा टंचाई, 'चारा मित्र' संकल्पना, जलतारा योजना आणि विविध धरणांतील पाणीसाठा याबाबत माहिती दिली. जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी आढावा सादर केला.

या बैठकीत कृषी, पाटबंधारे, पशुसंवर्धन, महानगरपालिका, नगरपालिका प्रशासन, रोजगार हमी योजना, मृद व जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागांनी सुरू असलेली कामे, प्रलंबित कामे आणि आवश्यक निधीबाबत सविस्तर माहिती सादर केली.

या बैठकीस नांदेड पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता इ. म. चिस्ती, महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय खंडारे, जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक एस. पी. राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता ए. एस. कांबळे, नांदेड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही. आर. बनसोड व श्रीकांत थोरात, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता रा. मा. देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता महेश पाटील, नगरपालिका प्रशासनाचे सहआयुक्त शैलेश फडसे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी. जी. सोनकांबळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रवीण गायकवाड, ईश्वर पिन्नलवार मध्य रेल्वेच्या सल्लागार समितीवर

मुदखेड -भारतीय जनता पक्षाचे भोकर विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ व निष्ठावंत नेते प्रवीण गायकवाड यांची मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या शिफारशीनुसार दिव्यांग प्रवर्गातून त्यांची निवड झाली असून, यासंदर्भातील नियुक्तीपत्र त्यांना प्राप्त झाले आहे. तसेच माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या शिफारशीनुसार मुदखेड येथील ज्येष्ठ पत्रकार ईश्वर विठ्ठलराव पिन्नलवार यांची नांदेड विभाग, दक्षिण मध्य रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीच्य सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. पत्रकार ईश्वर पिन्नलवार यांची नांदेड विभाग दक्षिण मध्य रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल आमदार श्रीजया चव्हाण, दैनिक प्रजावाणी चे संपादक गोवर्धन बियाणी, संपादक शंतनू डोईफोडे, संतोष पाडांगळे, चारुदत्त चौधरी,अभिजित देशमुख, बाळासाहेब देशमुख बारडकर, यांच्यासह अदीने अभिनंदन केले. प्रविण गायकवाड यांनी गेल्या अडीच दशकांपासून भाजपमध्ये निष्ठेने कार्य करत पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी योगदान दिले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.या समितीच्या माध्यमातून रेल्वे प्रवाशांच्या समस्या, उपलब्धसुविधा आणि रेल्वे सेवांचा दर्जा यासंबंधीचे प्रश्न रेल्वे प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. त्यांच्या नियुक्तीमुळे प्रवाशांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रवीण गायकवाड व ईश्वर पिन्नलवार यांच्या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

कु. पायल राठोडची राज्यस्तरीय धावण्याच्या स्पर्धेसाठी निवड

बाऱ्हाळी -येथील विद्या विकास विद्यालयाची विद्यार्थिनी कु.पायल राठोड हिने धाराशिव येथे संपन्न झालेल्य विभागीय स्तरावरील ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या दैदिप्यमान कामगिरीच्या जोरावर तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, तिच्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण सराव, मेहनत, जिद्द आणि आत्म विश्वासाची आवश्यकता असते. या गुणांच्या जोरावर पायल राठोडे हिने विभागीय स्तरावरील धावण्याच्या स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक मिळविला. तिच्या या कामगिरीमुळे तिला आता राज्यस्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. विभागीय स्तरावर मिळविलेल्या यशानंतर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेली निवड ही पायलच्या क्रीडा प्रवासातील महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे.पायलच्या या यशाबद्दल विद्या विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे, प्राचार्य प्रा. शिरीष लव्हेकर, प्रशिक्षक सुधीर कानवटे, सचिन जाधव व शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही तिने उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

गळेगांवात पहिल्यांदाच महिलांनी केली दुर्गा देवीची प्रतिष्ठापणा

आदमपुर-बिलोली तालुक्यातील ग्राम गळेगांव येथे सामुहिक पहिल्यांदाच गावातील महिलांनी सहभाग घेत सार्वजनिक दुर्गा मंडळ स्थापन करीत दुर्गा देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा केली आहे. मागच्या रविवारी शारदीय नवरात्रारंभ पर्वास अर्थात 'घटस्थाना' शहर व गावोगावी करण्यात आली. गळेगांवात दुर्गा देवी परिसरात रोषणाई,दांडिया खेळणारी मुले,मुली,भारूड,किर्तन जागर,गवळणी आदि कार्यक्रमांची रेलचेल आहे. मन्याड नदीच्या परिसरात वसलेल्या लहानशा गावात प्रथमच महिला एकत्रित येऊन येऊन दुर्गा देवीच्या मूर्तीची भक्तिमय वातावरणात प्रतिष्ठापना करून सामाजात 'नारी शक्तीचा' एक अनोखा पायंडा पाडण्यात महिला यशस्वी झाल्या आहेत. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत.बुधवार दि.१४ ऑक्टोबर रोजी नवरात्रातील चौथा दिवस असल्याने जेष्ठ नागरिक सचिव हुल्लप्पा नाईक यांनी सहकुटुंब सहपरीवार आरतीचा मान पटकावला.मुखोद्गत दैनंदिन नियमित आरतीत रेवणअप्पा मठपती,चि.ओमकार मठपती,सौ.सुनिता बेजगमवार सावकार यांनी सहभाग नोंदवला. यावेळी सार्वजनिक दुर्गा देवी मंडळ महिला सदस्य म्हणून भारतबाई उमाकांत नाईक, राज्याबाई पिनलवार, कृष्णाबाई पांचाळ, सखुबाई खांडेकर, शेवंताबाई तोकलवाड, कृष्णाबाई निमलवाड, कमलबाई ठाकूर, गंगाबाई नागामोड, अरूणा मुंडकर,शिलाबाई उस्कीलवार, कुसुमबाई मठपती,तुळसाबाई नाईक, सीमा येवते,मंगलबाई पाटील, जनाबाई नाईक, सविता नाईक, जयश्री पाटील, लक्ष्मीबाई नाईक, मधाबाई शंकर, अध्यक्ष राजशेखर मुंडकर, उपाध्यक्ष सुनील नाईक, सदस्य हाणमंत निमलवाड व गावकरी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

बदली झालेल्या अभियंत्याची कार्यमूक्त होण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ

तभा वृतसेवा
हिमायतनगर, दि. १७ ऑक्टोबर -

सार्वजानिक बांधकाम उपविभाग हिमायतनगर येथील कार्यालयातील सहाय्यक अभियंता यांची प्रशासकीय बदली झाल्यानंतर ही ते प्रतिनियूक्तीचा आसरा घेवून हिमायतनगर कार्यालयाला चिकटून आहेत. प्रतिनियूक्ती आदेश तातडीने खारीज करावे. व तसेच बदलीच्या ठिकाणी त्यांना पाठवून देवून येथून कार्यमूक्त करूण अगोदरच्या सर्व कामकाजाची सखोल चौकशी करूण योग्य ती कारवाई करावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मनोज पाटील, धोंडोपंत बनसोडे यांनी केली आहे.

अधिक्षक अभियंता सार्वजानिक विभाग नांदेड यांना दिलेल्या निवेदनात पाटील यांनी म्हटले आहे की, येथे बांधकाम विभागात कर्तव्यावर असलेले सहाय्यक अभियंता सुरज कंधारकर यांची किनवट येथे बदली झालेली आहे. परंतू ते बदली झालेल्या ठिकाणी रूजू न होता प्रतिनियूक्तीचा आसरा घेवून ते हिमायतनगर कार्यालयातच ठाण मांडून बसलेले आहेत. श्री कंधारकर हे जवळपास १० वर्षापासून हिमायतनगर येथेच आहेत. त्यांची बांधकाम विभागात काम करणार्या ठेकेदार यांच्याशी जास्तीची जवळीक निर्माण झाल्याने त्यांना हिमायतनगर सोडवेनासे झाले आहे. आपले अर्थिक नुकसान होईल. म्हणूनच ते फक्त आणि फ्कत प्रतिनियूक्तीचा आधार घेवून ते इथेच चिटकून बसले आहेत. त्यांच्या कामात भरपूर अनियमीतता आहे. ठेकेदाराचे चांगभले करण्यात पटाईत कंधारकर यांची खातेनिहाय चौकशी करावी. व तसेच त्यांना येथून तातडीने कार्यमूक्त करूण बदलीच्या ठिकाणी जाण्यासाठी आदेशित करावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मनोज पाटील, धोंडोपंत बनसोडे यांनी अधिक्षक अभियंत्यांकडे निवेदन देवून केली आहे.

लोह्यातील ऑटोचालकाच्या कन्येची ऐतिहासिक भरारी; मातंग समाजातील पहिली वकील होण्याचा मान

तभा वृतसेवा
लोहा, दि. १७ ऑक्टोबर -

जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते, हे लोहा शहरातील ऑटोचालक भारत दाढेल यांच्या कन्येने सिद्ध करून दाखवले आहे. लोहा शहरातील मातंग समाजातील पहिली वकील होण्याचा मान मिळविल्याची माहिती समोर येत असून, तिच्या या यशामुळे दाढेल कुटुंबासह समाजात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सामान्य परिस्थितीतून पुढे येत उच्च शिक्षण पूर्ण करणे आणि कायद्याच्या क्षेत्रात आपले स्थान निर्माण करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. ऑटो चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या भारत दाढेल यांनी आपल्या कन्येच्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट आणि तिने शिक्षणाप्रती दाखवलेली चिकाटी या यशामागील महत्त्वाचे पैलू आहेत.

आजच्या काळात शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून, स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणारे आणि समाजात सन्मानाने जगण्याची ताकद देणारे प्रभावी माध्यम आहे. कायद्याचे शिक्षण घेऊन वकिलीच्या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या या तरुणीचे यश समाजातील विद्यार्थिनींसाठी नवी उमेद निर्माण करणारे ठरू शकते.

नवरात्रोत्सवात भक्तीसोबत आरोग्यसेवेचा वसा; वैष्णवी दुर्गा मंडळाचा स्तुत्य उपक्रम!

तभा वृतसेवा
बिलोली, दि. १७ ऑक्टोबर -

शहरातील इंदिरानगर येथील वैष्णवी नवरात्र दुर्गा महोत्सव मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले धार्मिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत मंडळाने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. नवरात्रोत्सव म्हणजे केवळ देवीची आराधना आणि धार्मिक कार्यक्रम नव्हे, तर समाजहिताचे उपक्रम राबविण्याचीही एक संधी आहे हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून वैष्णवी नवरात्र दुर्गा महोत्सव मंडळाच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर , रक्तदान शिबीर व अस्थिरोग तज्ञ व दंतरोग तज्ञ उपस्थित होते आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असताना नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. हीच सामाजिक जाणीव लक्षात घेऊन मंडळाने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे आरोग्य शिबिर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ योगेश राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले यावेळी ३५४ रुग्णांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला आरोग्य सेवा देण्यासाठी डॉ सिद्दीकी, डॉ गणेश पेरके,डॉ ज्योती पुरी, डॉ पुजा काळे, डॉ प्रियंका तुडमे, डॉ बेग, जिजाई ब्लड बँकेचे शिवाजी शेवाळे व त्यांचे सहकारी आरोग्य कर्मचारी चव्हाण,बेटेराज, कैवारे,राठोड,काळेवार यांच्यासह मंडळाचे मार्गदर्शक देवराव गाडेकर, हनमंतराव गुरपवार, नागनाथ एंबडवार, चंद्रकांत स्वामी कासराळीकर,हानमंतराव सुंकलोड मंडळाचे अध्यक्ष श्रीनिवास उपाध्यक्ष साईनाथ शिरोळे कोषाध्यक्ष गंगाधर सुरकुतलावार सदस्य गजानन सुंकलोड, अनिल गायकवाड, संतोष दुडले,सुनील मेहकर अभिजीत गाडेकर, शिवशंकर कोंडलवाडे, नाना गुरुपवार, रितेश आडबे, सचिन पंते , सुदेश देवकर, आनंद कामनासे, श्रीधर यंबडवार, आदित्य पाटील, योगेश आडबे, कपिल नरवाडे यांच्यासह मंडळाचे सदस्य पदाधिकारी व कार्यकर्ते महिला मंडळी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते मंडळाच्या या कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

'दाते अमर राहती' उपक्रमातून अवयवदानाचा जागर

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १७ ऑक्टोबर -

मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याची ताकद अवयवदानात आहे. अवयवदानाच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते. हाच मानवतेचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील जनसेवेची २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत नांदेडमध्ये 'दाते अमर राहती' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हॉटेल स्कायलाइट लॉन्स, स्टेडियमसमोर आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाने करण्यात आले. अवयवदानाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांना या जीवनदायी कार्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

आजच्या काळात मूत्रपिंड, यकृत, हृदय यांसह विविध अवयवांच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या अनेक रुग्णांना अवयव प्रत्यारोपणाची गरज असते. मात्र, दात्यांची उपलब्धता आणि जनजागृतीचा अभाव ही मोठी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत अवयवदानाला सामाजिक चळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. अवयवदानाबाबत योग्य माहिती, वैद्यकीय मार्गदर्शन आणि कुटुंबीयांची संवेदनशील भूमिका यामुळे अनेक रुग्णांना जीवनाची नवी संधी मिळू शकते. 'दाते अमर राहती' हा उपक्रम याच सामाजिक जाणिवेला बळ देणारा ठरणार आहे.

या कार्यक्रमाला भाजपा महानगराध्यक्ष आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार श्रीजयाताई चव्हाण, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, महापौर कविता संतोष मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय कदम, नगरसेविका तथा भाजपा युवती आघाडी प्रमुख शांभवी प्रवीण साले यांची उपस्थिती होती.

या उपक्रमाचे आयोजन नगरसेवक डॉ. अंकुश देवसरकर आणि डॉ. शुभांगी अंकुश देवसरकर यांनी केले. यावेळी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जागरूक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'अवयवदान हे केवळ दान नसून, दुसऱ्याला जीवन देण्याचे महान कार्य आहे. मृत्यूनंतरही आपले अवयव दुसऱ्याच्या शरीरातून जीवनाची नवी उमेद देऊ शकतात, हा विचार समाजात रुजविणे ही काळाची गरज आहे,' असा सामाजिक संदेश या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर शहरातील विकास कामे त्वरीत थांबवा:राजेश्वर देशमूख

तभा वृतसेवा
भोकर, दि. १७ ऑक्टोबर -

पावसाचे प्रमाण सर्वत्र कमी झाल्यामूळे राज्यसरकारने भोकर तालूका दूष्काळग्रस्त म्हणून घोषीत करण्यात आला प्रशासनाकडून पाणी बचाव साठी शहराला एक दिवसा आड पाण्याचा पूरवठा सूरु करण्याची घोषणा केली कन्स्ट्रक्शनच्या कामावर मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होत असल्याने भविष्यात शहरातील नागरीकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता असून त्याकरिता शहरातील एकलारे कन्स्ट्रक्शनची सूरु असलेली कामे त्वरीत थांबवून शहरातील पूर्ण पाणीसाठा जनतेसाठी राखीव ठेवण्याची मागणी नगरसेवक राजेश्वर देशमूख यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की,नगरपरिषद प्रशासनाने शहराला लागणारा पाणी पूरवठा भविष्यातील परिस्थिती लक्षात घेवून एक दिवसा आड पाण्याचा पूरवठा करण्याचे घोषीत केले आहे.शहरात एकलारे कन्स्ट्रक्शनकडून सूरु असलेली विकासकामावर मोठ्या प्रमाणात पाणी वापर होत असून जनतेसाठी पाणी कमी पडू नये म्हणून कन्स्ट्रक्शनची होत असलेली कामे त्वरीत थांबवावी अन्यथा नगर परिषद प्रशासनाविरोधात तिव्र जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा दिला आहे.

गोवंशाची क्रूरपणे वाहतूक; पाच जनावरांची सुटका

तभा वृतसेवा
नरसी, दि. १७ ऑक्टोबर -

गोवंशाची अवैध वाहतूक आणि जनावरांवरील क्रूरतेला आळा घालण्यासाठी नांदेड जिल्हा पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत नायगाव पोलिसांनी गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) होटाळा ते नरसीमार्गे मुखेडकडे जाणाऱ्या रस्त्यावर कारवाई करत गोवंशाची अवैध व निर्दयतेने वाहतूक करणारी महिंद्रा बोलेरो पिकअप पकडली. या वाहनातून पाच गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली. पोलिसांनी वाहनासह जनावरे असा एकूण ५ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात गोवंशाच्या अवैध वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर नायगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना महिंद्रा बोलेरो पिकअपमधून गोवंश जनावरांची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीची दखल घेत नायगाव पोलिसांच्या पथकाने होटाळा येथून नरसीमार्गे मुखेडकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. यावेळी संशयित महिंद्रा बोलेरो पिकअप (क्रमांक एमएच २६ एडी ८२२७) अडवून पंचांसमक्ष वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये पाच गोवंश जनावरे दाटीवाटीने आणि दोरीने बांधून वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी या कारवाईत चार लाख रुपये अंदाजे किमतीची महिंद्रा बोलेरो पिकअप आणि एक लाख १२ हजार रुपये किमतीची पाच गोवंश जनावरे असा एकूण पाच लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वाहनातील जनावरांची निर्दयतेने वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी त्यांची सुटका केली.

या प्रकरणी सय्यद अलीम चाँदसाब (वय ५०, वाहनचालक) आणि मोहीददीन अब्दुलसाब कुरेशी (वय ४९), दोघेही रा. बेटमोगरा, ता. मुखेड, यांच्याविरुद्ध नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३७/२०२६ अन्वये प्राण्यांना क्रूरतेने वागणूक प्रतिबंधक कायद्याच्या कलम ११(१)(ड) व (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार, नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार माधव पवार, विनोद भंडारे आणि होमगार्ड यांनी ही कारवाई केली.

अवैध वाहतुकीची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन

गोवंशाची अवैध वाहतूक, जनावरांवरील क्रूरता किंवा कत्तलीच्या उद्देशाने संशयास्पद पद्धतीने जनावरांची वाहतूक होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा किंवा डायल ११२ वर माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.